रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३३०
www.ramprahar.com

◆ गुरुवार, १८ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


फेस रिकग्निशनद्वारे होणार नाशिकमध्ये मतदान/२

खवय्यांचा हिरमोड; पाऊस लांबल्याने मासे गायब/५

बेल्जियमला मानावे लागले बरोबरीवर समाधान/८


## मान्सूनची वाटचाल ठप्प! महाराष्ट्रात काही दिवस उकाडाच

**मुंबई :** नैऋत्य मोसमी पावसाची (मान्सून) वाटचाल सध्या मंदावली असून पुढील दोन ते तीन दिवस



महाराष्ट्रातील बहुतांश भागांना उष्णतेच्या लाटा आणि दमट हवामानाचा सामना करावा लागणार आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार प्रशांत महासागरात विकसित होत असलेल्या अल निनोच्या प्रभावामुळे यंदा मान्सूनचा वेग कमी झाला असून जूनमध्ये सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. गेल्या आठवडाभरापासून महाराष्ट्रातील मान्सूनची प्रगती जवळपास ठप्प झाली आहे. सध्या मान्सून रेषा कोकणातील हर्णे ते सोलापूर पट्ट्यातच स्थिरावली असून पुढील काही दिवस त्यात विशेष बदल होण्याची शक्यता कमी आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते २५ जूननंतर मान्सूनला पुन्हा गती मिळू शकते.

# विरार-अलिबाग प्रवास आता सुपरफास्ट

## कॉरिडोरच्या पहिल्या टप्प्याला मान्यता



**अलिबाग : प्रतिनिधी**

मुंबई महानगर प्रदेशातील (एमएमआर) वाहतूक व्यवस्थेला गती देण्यासाठी आणि पालघर, ठाणे व रायगड या तिन्ही जिल्ह्यांना एकाच वेगवान सूत्रात बांधण्यासाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी ठरणाऱ्या विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेच्या (विरार अलिबाग मल्टीमोडल कॉरिडोर) पहिल्या टप्प्याला अखेर प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) विकसित करण्यात येत असलेल्या या प्रकल्पाची एकूण लांबी १२६ किलोमीटरची आहे.

हा प्रकल्प भविष्यातील झपाट्याने होणारा विकास, वाढते नागरीकरण आणि जेएनपीए बंदराशी होणारी मालवाहतूक लक्षात घेऊन डिझाईन करण्यात आला आहे. संपूर्ण प्रकल्पाची विभागणी दोन प्रमुख टप्प्यांत करण्यात आली असून या कॉरिडोरचे अंतिम टोक अलिबाग असल्याने कोकणच्या पर्यटन आणि आर्थिक विकासाला यामुळे मोठी चालना मिळणार आहे. या प्रकल्पाचा मुख्य आणि सर्वात मोठा भाग असलेल्या नवघर ते बळवली या पहिल्या टप्प्याला प्रशासकीय मंजुरी मिळाल्यामुळे प्रत्यक्ष भूसंपादन आणि बांधकाम प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला आहे.

हा पहिला टप्पा सुमारे ७९ किलोमीटर लांबीचा असून तो पालघर जिल्ह्यातील विरारजवळील नवघर येथून सुरू होणार आहे. तेथून भिवंडी, कल्याण, पनवेल असा प्रवास करीत हा महामार्ग थेट रायगड जिल्ह्यातील पेणजवळील बळवलीपर्यंत पोहचेल. या मार्गावर मेट्रो मार्गिका, बससाठी स्वतंत्र मार्ग (बीआरटीएस) आणि बहुउद्देशीय वाहनांसाठी स्वतंत्र मार्गिका असणार आहेत. हा टप्पा मुंबई-अहमदाबाद हायवे, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग आणि मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे यांना जोडणारा एक महत्त्वाचा अंतर्गत दुवा ठरणार आहे, ज्यामुळे मुंबई-ठाणे शहरात न जाता थेट रायगडमध्ये प्रवेश करणे शक्य होईल. प्रकल्पाचा दुसरा टप्पा पेण तालुक्यातील बळवलीपासून सुरू होऊन थेट अलिबागपर्यंत जाणार असून त्याची लांबी सुमारे ४७ किलोमीटर आहे. भौगोलिक रचनेनुसार पेण आणि अलिबागदरम्यान वडखळ हे मुख्य जंक्शन येत असल्याने हा संपूर्ण मार्ग वडखळमार्गे अलिबागला जोडला जाईल. या दृश्य टप्प्यामध्ये पेण, वडखळ आणि अलिबाग या तिन्ही महत्त्वाच्या व्यापारी व पर्यटन क्षेत्रांचा समावेश होतो.

### अंतर केवळ दोन तासांत पार करता येणार

सद्यस्थितीत मुंबई-गोवा महामार्गावरून अलिबागकडे जाताना वडखळ आणि पेण परिसरात होणारी वाहतूक कोंडी सर्वश्रुत आहे, मात्र हा कॉरिडोर थेट वडखळमार्गे अलिबागला जोडला जाणार असल्यामुळे विरार ते अलिबाग हे अंतर अवघ्या दीड ते दोन तासांत कापणे प्रवाशांना शक्य होणार आहे. यामुळे रायगड जिल्ह्यातील स्थानिक रोजगार, पर्यटन आणि कृषी उत्पादनांच्या वाहतुकीला मोठी गती मिळू शकेल.



# भाजप सत्तेत येण्यासाठी तळागाळातील कार्यकर्त्यांचे योगदान

## प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे प्रतिपादन

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

"संधी साधून महाविकास आघाडीमध्ये गेलेल्यांना मी प्रदेशाध्यक्ष असताना पुन्हा भाजपमध्ये प्रवेश दिला जाणार नाही," असा स्पष्ट इशारा भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी रत्नागिरीत दिला. येथील स्वातंत्र्यवीर सावरकर नाट्यगृहात आयोजित भाजप पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. भाजपची सत्ता केंद्रापासून राज्यापर्यंत पोहचण्यामागे तळागाळातील निष्ठावंत कार्यकर्त्यांचे योगदान असल्याचे सांगत "प्रत्येक गावात किमान पाच कट्टर विचारांचे भाजप कार्यकर्ते उभे करा," असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमाला भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार निरंजन डावखरे, प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, आमदार प्रमोद जठार, माजी आमदार विनय नातू, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, दक्षिण रत्नागिरी जिल्हाध्यक्ष प्रशांत यादव, उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष सतीश मोरे, वैभव खेडेकर, ॲड. दीपक पटवर्धन, माजी आमदार सूर्यकांत दळवी तसेच उपनगराध्यक्ष समीर तिवरेकर आदी उपस्थित होते.

माजी जिल्हा परिषद सदस्य सहदेव बेटकर यांनी यावेळी भाजपमध्ये प्रवेश केला तसेच चिपळूण, खेड,

### रत्नागिरीतील मेळाव्यात अनेकांचा पक्षप्रवेश



मंडणगड, राजापूर व रत्नागिरी परिसरातील ५००हून अधिक माजी लोकप्रतिनिधी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व माजी नगरसेवकांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. कोकणातील बेरोजगारीचा प्रश्न गंभीर असल्याचे नमूद करत चव्हाण म्हणाले की, तरुण रोजगारासाठी मुंबईकडे स्थलांतर करतात. त्यामुळे गावे ओस पडतात. यात बदलासाठी धार्मिक पर्यटन प्रभावी पर्याय ठरू शकतो. मार्लेश्वर, गणपतीपुळे, संगमेश्वर सूर्यमंदिर, कसबा येथील छत्रपती संभाजी महाराज स्मारक, राजापूर येथील श्री धूतपापेश्वर मंदिर यांसारख्या स्थळांचा विकास करून रोजगारनिर्मिती होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# ऑपरेशन टायगरचा सस्पेन्स कायम

## फुटीर खासदारांना ठाकरे गटाकडून व्हिप जारी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या राजकारणात बुधवारी (दि. १७) मोठी खळबळ उडून ठाकरे गटाच्या शिवसेनेचे सहा खासदार फुटल्याचा दावा केला जात आहे. या सहा खासदारांनी लोकसभा अध्यक्षा ओम बिर्ला यांना सत्तेचे पत्र दिल्याचीही चर्चा होती, मात्र त्यावेळी शिंदेंच्या शिवसेनेकडे सहा खासदार गेले नाहीत, दोन खासदारांनी पक्षाच्या पत्रावर सह्या केल्या नाहीत, असा विश्वास ठाकरे गटाच्या शिवसेनेकडून व्यक्त करण्यात आला, तर शिवसेनेचे ऑपरेशन टायगर यशस्वी झाले असून काही तांत्रिक अडचणींमुळे त्याचे पुरावे



समोर आणले नाहीत, मात्र ठाकरे गटाचे कायदेशीर डावपेच बघूनच पुढची पावले टाकू, असे शिंदेंच्या शिवसेनेच्या गोटातून सांगण्यात आले आहे. दरम्यान, ठाकरे गटाच्या सहा खासदारांबाबतचा सस्पेन्स रात्री उशिरापर्यंत कायम होता.

येत्या दोन दिवसांत तरी अधिकृतरीत्या काहीही समोर आणले जाणार नाही, अशी माहिती शिवसेनेच्या वरिष्ठ सूत्रांनी दिली. आज झालेले ऑपरेशन टायगर हे फुलप्रूफ असून त्यात काहीही अडचण नाही. त्याबाबत मात्र आता लगेच काहीही जाहीर करायचे नाही. कोणतेही पुरावे समोर आणायचे नाहीत, असे शिंदेंच्या शिवसेनेने ठरवले आहे. यामागे काही तांत्रिक गोष्टी आहेत. ठाकरे गट काय कायदेशीर डावपेच आखतो त्यावर पुढची पावले टाकली जातील, अशी माहिती शिवसेनेच्या वरिष्ठ सूत्रांनी दिली.

**ठाकरे गटाच्या शिवसेनेची आज बैठक**

दरम्यान, ठाकरे गटाच्या शिवसेनेकडून संसदीय दलाची बैठक बोलावण्यात आली आहे. ही बैठक खासदारांच्या एकनिष्ठतेची लिटमस टेस्ट ठरणार आहे. गुरुवारी सकाळी ११ वाजता नवी दिल्लीत ही बैठक पार पडणार आहे. शिंदेंसोबत सहा खासदार नसल्याचा विश्वास ठाकरे गटाच्या शिवसेनेला असल्याची माहिती सूत्रांनी दिली. ठाकरे गटाच्या शिवसेनेकडून सर्व खासदारांना व्हिप जारी करण्यात आला आहे. गुरुवारच्या बैठकीत किती खासदार येतात यावरच ठाकरे गटाच्या शिवसेनेची पुढील भूमिका ठरणार आहे. दरम्यान, ऑपरेशन टायगर यशस्वी झाले की नाही हे दोन्ही गटांकडून अद्याप अधिकृतरीत्या समोर आले नाही.

## निवडक

### मुंबईत बांधकामांचे पाणी बंद; मनपाकडून कडक निर्बंध लागू

**मुंबई :** मान्सूनला विलंब व धरणांतील पाणीसाठ्यातील घटीमुळे मुंबई मनपाने पाणीवापरावर बुधवारपासून निर्बंध लागू केले. सर्व बांधकामांसाठीच्या जलजोडण्या तात्पुरत्या खंडित करण्यात आल्या असून नव्या बांधकामांसाठीच्या जलजोडण्यांना स्थगिती देण्यात आली. औद्योगिक, व्यापारी व स्पोर्ट्स क्लबच्या पाणीपुरवठ्यातही २० टक्के कपात करण्यात आली आहे.

### बदायूंत ट्रॅक्टर-रिक्षाच्या धडकेत सहा महिलांचा मृत्यू, तिघे जखमी

**बदायूं :** उत्तर प्रदेशातील बदायूंत ट्रॅक्टर व ई-रिक्षाच्या भीषण अपघातात सहा महिलांचा मृत्यू, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. बरेली-मथुरा महामार्गावर हा अपघात घडला. या महिला लग्नकार्यासाठी जात होत्या. अपघातातील मृतांमध्ये प्रेमा (३२), सरला (३२), राजुकुमारी (५०), रेवती (८०), नारायणी (३०) आणि आरती (३०) यांचा समावेश आहे.

# 'रयत'च्या रायगड विभागाची शाखाप्रमुख सभा

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते संतोष गुजर यांचा सेवानिवृत्ती सत्कार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्था रायगड विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली शाखाप्रमुख सहविचार सभा आणि विशेष सत्कार सोहळा संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत कामोठे येथील विभागीय कार्यालयात उत्साहात पार पडला. याप्रसंगी रायगड विभाग कार्यालयातील लेखनिक संतोष नारायण गुजर हे आगामी ३० जून रोजी सेवेतून सेवानिवृत्त होत असल्याने संस्थेच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते त्यांचा सपत्नीक भावपूर्ण सत्कार करण्यात आला.

कामोठे येथे झालेल्या या सभेदरम्यान आगामी शैक्षणिक वर्षाच्या दृष्टीने अनेक महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने शाळा-महाविद्यालयांमधील पटसंख्या वाढवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा आणि सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. तसेच मागील वर्षातील विविध परीक्षांच्या निकालांचे विश्लेषण करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासावर भर देण्याचे ठरले. डिजिटल युगाची गरज ओळखून या सभेत कृत्रिम बुद्धिमत्ता अभ्यासक्रमाचा आढावा घेण्यात आला तसेच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी 'अटल टिंकरिंग लॅब' आणि 'रयत टिंकरिंग लॅब' च्या कामकाजावर विशेष चर्चा करण्यात आली.

यासोबतच शिष्यवृत्ती व स्पर्धा परीक्षांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे आणि विविध शाखांना भेडसावणाऱ्या अडीअडचणी सोडवण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आले. या सभेला आणि सत्कार सोहळ्याला फुंडे कॉलेजचे प्राचार्य, विभागीय अधिकारी अमोल ठक्कर, सहाय्यक विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, लाईफ मेंबर विलासराव जगताप, प्रमोद कोळी, महेश पाटील, मुख्याध्यापिका विशाखा मोहिते, स्वप्नाली म्हात्रे, पुष्पलता ठाकूर, पीआरओ बाळासाहेब कारंडे, वैभव गावंड, श्रीमती चिखलेकर, करण म्हात्रे, महेश घोडके, अजित भोसले, सोमनाथ पाठे यांच्यासह अनेक शिक्षण क्षेत्रातील मान्यवर आणि रयत परिवारातील सदस्य उपस्थित होते.

# ज्येष्ठ पत्रकार वसंत ठाकूर यांचे निधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




पत्रकारितेतील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व आणि दैनिक रामप्रहरचे माजी उपसंपादक वसंत ठाकूर उर्फ अप्पा यांचे बुधवारी मध्यरात्री २ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. निधनासमयी ते ७१ वर्षांचे होते. वसंत ठाकूर यांनी अनेक वर्षे दैनिक रामप्रहरमध्ये उपसंपादक म्हणून काम पाहिले. त्यांच्या अचूक शब्दसंपदेमुळे आणि बातमीमागील नेमकेपणा ओळखण्याच्या कौशल्यामुळे ते 'अप्पा' म्हणून सर्वांच्या परिचयाचे होते. नवोदित पत्रकारांना मार्गदर्शन करण्यात त्यांचा नेहमीच पुढाकार असायचा. बातमीची मांडणी, हेडिंगची कल्पकता आणि भाषेवरील प्रभुत्व यासाठी त्यांचा लौकिक होता.

वसंत ठाकूर यांच्या निधनाची बातमी समजताच जिल्ह्यातील पत्रकार, संपादक आणि वाचकवर्गातून शोक व्यक्त होत आहे. अनेक ज्येष्ठ पत्रकारांनी त्यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा देत त्यांना श्रद्धांजली वाहिली. रामप्रहर परिवारानेही अप्पांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, मुलगा असा परिवार आहे. वसंत ठाकूर यांच्या निधनाने पत्रकारितेतील एक मार्गदर्शक आणि अभ्यासू व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. बुधवारी कर्जत तालुक्यातील वांजळे या मूळगावी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# विधी सीईटी परीक्षेत पुण्याच्या स्पंदना वत्सला १०० टक्के पर्सेंटाइल

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षातर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी घेण्यात आलेल्या पाच वर्षीय




विधी (एलएलबी) अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. यंदाच्या परीक्षेत पुण्याच्या स्पंदना वत्सने १०० पर्सेंटाइल गुण मिळवत राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे.

या परीक्षेत केवळ दोन विद्यार्थ्यांना १०० पर्सेंटाइल गुण मिळाले असून त्यामधील स्पंदना वत्स ही राज्यातील एकमेव विद्यार्थिनी ठरली आहे. सीईटी परीक्षा ७ मे २०२६ रोजी दोन सत्रांमध्ये संगणकाधारित (सीबीटी) पद्धतीने घेण्यात आली होती. या परीक्षेसाठी एकूण ४५ हजार १६० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. राज्यातील ४५ जिल्ह्यांतील १२० परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा पार पडली. हरियाणातील रेवाडी येथील सिद्धार्थ यादव यानेही १०० पर्सेंटाइल गुण मिळविले. विविध प्रवर्गांतील गुणवंत विद्यार्थ्यांत ठाण्याचा नीलेश तायडे ९९.९०, नागपूरची धनुश्री सुरभ ९९.७५, पुण्याचा श्रेयस शिंदे ९९.७५ यांच्यासह इतर विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय कामगिरी केली. सीईटी कक्षाने निकाल विद्यार्थ्यांना लॉगिनमध्ये उपलब्ध करून दिला असून या अभ्यासक्रमासाठीची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) लवकरच सुरू होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# आरटीआय नियमांत मोठे बदल

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने माहितीचा अधिकार (RTI) अधिनियमांतर्गत असणाऱ्या जुन्या नियमांचे अधिक्रमण करून राज्यात नवे 'महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६' लागू केले आहेत. सामान्य प्रशासन विभागाने १२ जून २०२६ रोजीच्या असाधारण राजपत्रात यासंबंधीची अधिकृत अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. नवीन नियमांनुसार अर्ज शुल्कात वाढ करण्यात आली असून पारदर्शकता वाढवण्यासाठी आणि अर्जांचा गैरवापर रोखण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण तरतुदी आणि मर्यादा घालण्यात आल्या आहेत. नवीन नियमांनुसार आता माहिती मिळवण्यासाठी सामान्य नागरिकांना जोडपत्र "अ"मधील विहित नमुन्यात ३० रुपये अर्ज शुल्क सादर करावे लागेल. यापूर्वी हे शुल्क कमी होते. माहिती पुरविण्याच्या दरांमध्येही सुधारणा करण्यात आली आहे. ए-४ प्रतीसाठी तसेच डिजिटल/स्कॅन प्रतींच्या प्रत्येक पृष्ठासाठी पाच रुपये शुल्क आकारले जाईल.

# रत्नागिरीत एफडीएची कारवाई

## सहा लाखांचा प्रतिबंधित पानमसाला जप्त



**रत्नागिरी : प्रतिनिधी**

नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने रत्नागिरी जिल्ह्यात जोरदार मोहीम राबवली. सात ठिकाणी धडक कारवाया करीत तब्बल सहा लाख ७ हजार १३५ रुपयांचा प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त करण्यात आला असून संबंधितांवर स्थानिक पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त मि. र. महांगडे यांनी माहिती दिली की, ही मोहीम आगामी काळात आणखी तीव्र करण्यात येणार आहे.

जिल्ह्यात ६० अन्न आस्थापनांची झाडाझडती घेण्यात आली असून बेकरी आणि हॉटेल्स प्रशासनाच्या रडारवर आहेत. गुटखा मुक्त महाराष्ट्र मोहिमेअंतर्गत राज्यभरात कारवाई सुरू आहे. FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानंतर धाराशीव, धुळे, नांदेड, पुणे, मुंबईसह अन्य ठिकाणी धाडसत्र हाती घेण्यात आले. राज्यभरात १९५ ठिकाणी टाकलेल्या धाडींत १९२ जणांना अटक करण्यात आली असून एक कोटी ९९ लाखांचा गुटखा-पानमसाल्याचा साठा जप्त झाला आहे. मुंढे यांनी स्पष्ट केले की, "गुटखामुक्त महाराष्ट्र, निरोगी महाराष्ट्र ही मोहीम केवळ कायदेशीर कारवाई नसून नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी सुरू असलेली निर्णायक लढाई आहे. जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांविरोधात सरकारने आता शून्य सहनशीलता धोरण स्वीकारले आहे."

# पुणे-साईनगर शिर्डी एक्स्प्रेसचा शुभारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

पुणे-साईनगर शिर्डी एक्स्प्रेसला बुधवारी (दि. १७) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतून ऑनलाइन पद्धतीने उपस्थित राहत, तर केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी पुण्यातून झेंडा दाखवून शुभारंभ केला. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमास विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे उपस्थित होते.

पुणे रेल्वे स्थानक येथे केंद्रीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, आमदार विवेक कोल्हे आदी उपस्थित होते. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, पुणे रेल्वे परिसराची क्षमता वाढविण्यासाठी हडपसर, शिवाजीनगर, खडकी, उरुळी आणि आळंदी परिसरातील विविध रेल्वे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

# फेस रिकग्निशनद्वारे होणार नाशिकमध्ये मतदान

## विधान परिषद निवडणुकीत राज्यातील पहिला प्रयोग

**नाशिक : प्रतिनिधी**

निवडणूक प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि अचूकता आणण्यासाठी नाशिकमध्ये एक महत्त्वाचा तांत्रिक प्रयोग राबविण्यात येणार आहे. विधान परिषदेच्या नाशिक स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदारांच्या ओळख पडताळणीसाठी फेस रिकग्निशन तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असून, अशा प्रकारचा हा राज्यातील पहिलाच प्रयोग ठरणार आहे.



विधान परिषदेच्या नाशिक स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत अवघे ६१९ मतदार अआहे. त्यामुळे नाशिकमध्ये यासंदर्भातील राज्यातील पहिला प्रयोग राबवण्यात येणार आहे. त्याला राज्य निवडणूक आयोगाने तत्त्वतः मान्यता दिली असून, १८ जून रोजी होणाऱ्या मतदानात त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

उपक्रमासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आयुष प्रसाद यांनी पुढाकार घेतला आहे. सी डॅक या मान्यताप्राप्त संस्थेने खास ॲप तयार केले असून नाशिक महापालिकेसह अन्य नगरपालिकांमधील मतदारांचे फोटो आणि माहिती ॲपवर संकलित केली जात आहे. १८ जून रोजी विधान परिषदेसाठी मतदान करताना आधी मतदार नगरसेवकाला चेहरा स्कॅन करून तपासले जाईल. त्यामुळे दुबार मतदानाचा प्रकार टळेल.

राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त चोक्कलिंगम यांनी या अभिनव प्रयोगाला मान्यता दिली आहे. मात्र हा प्रायोगिक स्वरूपातील उपक्रम असल्याने फेस रिकग्निशन प्रक्रियेत काही तांत्रिक अडचणी आल्यास संबंधित मतदाराला मतदानापासून वंचित ठेवले जाणार नाही. आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून त्याला मतदानाची परवानगी दिली जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

> **नाशिकमध्ये या पहिल्याच प्रयोगाला राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त चोक्कलिंगम यांनी मान्यता दिली आहे. अर्थात हा प्रयोग असल्याने मतदाराचे फेस रिकग्निशन होण्यात अडचणी आल्या तरी मतदान करू दिले जाणार आहे. त्यामुळे मतदार नगरसेवक किंवा उमेदवारांनी शंका घेण्याचे कारण नाही.**
> **–मधुमालती सरदेसाई,**
> उपजिल्हा निवडणूक अधिकारी, नाशिक

# ओएनजीसी उरण प्लांटबाहेर तेल गळतीचे वृत्त खोटे

## कंपनीकडून सविस्तर स्पष्टीकरण आणि चौकशीचे आदेश

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ओईल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ओएनजीसी) च्या उरण येथील प्लांटबाहेर तेल गळती झाल्याच्या चर्चांना कंपनी प्रशासनाने पूर्णविराम दिला आहे. दि. १७ जून २०२६ रोजी ओएनजीसी उरण प्लांटबाहेर तेल गळती झाल्याच्या काही बातम्या आणि अफवा पसरल्या होत्या, मात्र या सर्व बातम्या पूर्णपणे चुकीच्या आणि निराधार असल्याचे स्पष्टीकरण ओएनजीसीने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिले आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीची माहिती देताना ओएनजीसीने सांगितले की, आज सकाळी साधारण १०:५० वाजताच्या सुमारास उरण प्लांटसमोरील रस्त्याच्या पलीकडे असलेल्या एका पावसाळी पाण्याच्या नाल्यातून (स्टॉर्म वॉटर चॅनल) उग्र आणि आम्लयुक्त वायूचे/धुराचे लोट निघत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या माहितीमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून ओएनजीसीच्या आपत्कालीन पथकाने (इमर्जन्सी टीम) तातडीने घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला.

या पथकाने केलेल्या प्राथमिक तपासणीत ओएनजीसीच्या कोणत्याही पाईपलाईनमधून कोणत्याही प्रकारची गळती झाली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच या संपूर्ण प्रकारामुळे प्लांटच्या दैनंदिन कामकाजावर कोणताही परिणाम झालेला नाही आणि कामकाज नेहमीप्रमाणे सुरळीत सुरू आहे.

असे असले तरी, सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत, या नाल्यातून अचानक उग्र धूर किंवा वायू का निघत होता, याच्या मूळ कारणाचा शोध घेण्यासाठी ओएनजीसीने सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. ओएनजीसी मुंबईच्या कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स विभागाने नागरिकांना कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि घाबरून न जाण्याचे आवाहन केले आहे.

# तळा शहराची पाणी समस्या कायम

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरातील अनेक ठिकाणी नागरिकांच्या नळाला गढूळ पाणी येत असल्याने आरोग्य धोक्यात आले आहे. शहरात काही भागात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असून भर उन्हाळ्यात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दूरवर पायपीट करावी लागत आहे.तर काही ज्यांची परिस्थिती चांगली आहे ते पाणी खाजगी पाणी विक्रेत्यांकडून विकत घेत आहेत.अंबेळी व तहसिल शेजारील धरण या दोन ठिकाणी असलेल्या नगरपंचायतीच्या बोरिंगच्या माध्यमातून तळा

नळाला गढूळ पाणी



शहराला पाणी पुरवठा केला जातो.

गेल्या अनेक वर्षांपासून एप्रिल, मे व जून महिन्यात येत असलेली पाण्याची टंचाई याही वर्षी अधिक प्रमाणात आहे. काही ठिकाणी दोन दिवसा आड ,तीन दिवसा आड , चार दिवस आड पाणी येत असून मागील दोन, तीन दिवसांपासून गढूळ पाणी नळाला येत असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.काही भागात महिलांना

पाण्यासाठी दूरवर पायपीट करावी लागत आहे. मागील दोन ते तीन दिवसांपासून तळा शहरात गढूळ पाण्याचा पुरवठा होत असल्याचे शहरातील नागरिकांनी सांगितले. हे पाणी वापरण्यायोग्य नसल्याने ग्रामस्थांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याचा धोका आहे .गढूळ पाण्याची समस्या त्वरित मार्गी लावण्याची मागणी शहरवासीयांनी केली आहे.

# 'रायगडातील पाणीपुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करा'

**मुंबई, : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील दासगाव वहुर पाणीपुरवठा योजनेअंतर्गत दोन ऐवजी तीन पाण्याच्या टाक्या बांधण्यात याव्यात. तसेच जल जीवन मिशन योजनेअंतर्गत येणाऱ्या पाणीपुरवठा योजनानांची कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.

जलजीवन मिशन अंतर्गत महाड व माणगाव तालुक्यातील पाणीपुरवठा योजनेची आढावा बैठक पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षखाली झाली. रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन



नैनुटीया, रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, रायगड जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता मोहन सरावदे, मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी प्रशांत भामरे, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, शिक्षण व वित्त सभापती चंद्रकांत कळंबे, जिल्हा परिषद सदस्य विकास गोगावले, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, जिल्हा परिषद रायगड यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्ह्यामध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत व नळ पाणीपुरवठा योजना अंतर्गत किती नळ जोडणी बाकी आहे याचा आढावा घेऊन त्यासंदर्भात जिल्हा नियोजन समितीकडे प्रस्ताव द्यावा व त्यातून नळ पाणी पुरवठा योजनेची नळ जोडणी पूर्ण करून घ्यावी. रायगड जिल्ह्यामध्ये ज्या मंजूर योजना आहेत त्यामध्ये काही त्रुटी आहेत त्या त्रुटी पूर्ण करून सुधारित प्रशासकीय मान्यता घेऊन योजना पूर्ण कराव्यात, असे निर्देश मंत्री पाटील यांनी दिले. यावेळी दाभोळ व टोळा (बु), दासगाव वहुर, खैरे व २१ गावे, पोलादपूर व १४ योजना यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

# आदिवासी मजुरांचे मूळगावी प्रस्थान : तीन महिने शेतीच्या मजुरीवर गुजराण



**खोपोली : प्रतिनिधी**

गृहसंकुलाच्या तसेच वेठबिगारी व हाताला मिळेल ते काम करून खोपोली शहरात आदीवासी कुटुंबे मोकळ्या जागेवर आपला संसार थाटून कुटूंबाचा गाडा हाकत असतात परंतु पावसाळा तोंडावर आल्याने या कुटुंबानी आपल्या मुळगावाकडे प्रस्थान केल्याने मजुरांचा तुटवडा निर्माण झाल्याने ठेकेदारंकडून चिंता व्यक्त केली जात आहे.

शहरात मोठ्या प्रमाणावर गृहसंकुलाची कामे सुरु असल्याने पुणे व रायगड जिल्हा लगत असणाऱ्या बहुबल भागातील आदीवासी कुटूंबे खोपोलीत वेठबिगारीची कामे करुन मिळेल त्या मोकळ्या जागेवर संसार थाटून कुटूंबाचा उदरनिर्वाह करतात त्यांच्या वास्तव्यमुळे मजुरांचा तुटवडा पडत नसल्याने व एकाच ठिकाणी सहज मजूर मिळत असल्याने ठेकेदारांची धावपळ कमी होते.

पावसाळा तोंडावर आला की, हि कुटुंबे आपल्या मुळ गावाकडे जातात झोपड्याची वजा घराची डागडुजी करीत तिन महिने लागेल एवढा लाकूड, फाटा गोळा करुन खोपीत बंदीस्त करतात या तिन, चार महिण्यात शेतात तसेच हाताला मिळेल ते काम करुन कुटुंबाची गुजराण करीत असतात एकदा भादवा संपला कि हि कुटुंबे आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी पुन्हा आपला मोर्चा शहराच्या दिशेने वळवत असले तरी त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न हा कायमचाच भेडसावत असतो. आभाळाच्या छताचा आधार घेत अशी अनेक कुटुंबे आलेल्या दिवसांशी दोनहात करीत जगण्यासाठी धडपड करीताना दिसत असून जणू काही हे आपल्या पाचविलाच पुजल्याचे म्हणत मुळाबाळांना कवेत घेत जगण्यासाठी संघर्ष करताना दिसतात.

# लोहोप आरोग्य केंद्राकडून हिवताप जनजागृती उपक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,वडगाव व प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप च्या संयुक्त विद्यमाने वडगाव शाळा,अंगणवाडी व गावात प्रभात फेरी काढून व पथनाट्याच्या माध्यमातून,घोषणा व फलक प्रदर्शनाने गावात जनजागृती करण्यात आली.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी मार्गदर्शन करताना मलेरियाचे डास ज्या ठिकाणी उत्पन्न होतात ती ठिकाणे सर्वप्रथम निर्जंतुक व पाणी साठणार नाही याची काळजी घेणे आवश्यक असून,अशी ठिकाणे दिसल्यास वाडीलधाऱ्यांच्या मदतीने ती साफ करावीत.याविषयी मार्गदर्शन केले.तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप चे आरोग्य सहायक डी.ओ.भस्मा यांनी या ता०याविषयी माहीती दिली.

यावेळी शिक्षक वैजनाथ जाधव यांनी सर्वांचे स्वागत केले,याप्रसंगी शिक्षिका मयुरी धायगुडे,कल्पना वाजेकर,भोईर सर,प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य सेवक.तांबडे, बाळासाहेब कोल्हे,रोशन निंबाळकर,व पालक उपस्थित होते.

# राजिप चिपळे शाळेत पनवेल तालुका पत्रकार विकास मंचने केले शैक्षणिक साहित्याचे वाटप



**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने रायगड जिल्हा परिषदेतील शाळांमधून शैक्षणिक वाटप करत आपली परंपरा जपली आहे. बुधवार दिनांक १७ जून रोजी सुकापुर केंद्र अंतर्गत येणाऱ्या चिपळे रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये ज्येष्ठ पत्रकार तथा सल्लागार माधव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तर राजेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शैक्षणिक वाटप कार्यक्रम संपन्न झाला.

पनवेल तालुका पत्रकार विकास मंच या पत्रकारांच्या सेवाभावी संस्थेने गेल्या दोन दशकापासून शैक्षणिक साहित्य वाटप करण्याची परंपरा अखंडपणे राबविली आहे. यंदाचे वर्षी प्रत्येक विद्यार्थ्याला एक बटण छत्री, स्वच्छता किट, एक लाँग बुक, दोन शॉर्ट बुक, पेन पट्टी पेन्सिल खोडरबर शार्पनर किट आणि गुड डे बिस्किट्स असे साहित्य प्रदान करण्यात आले. मुख्याध्यापिका माधवी दिवेकर यांनी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या सर्व सदस्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

मंचाचे सल्लागार मंदार दोंदे यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले तसेच पनवेल तालुका पत्रकार विकास मंच सातत्याने करत असलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचे बाबत उपस्थितांना अवगत केले. शिक्षिका प्रिया भोसले यांनी शैक्षणिक वर्ष २६– २७ करता साहित्य वाटप केल्याबद्दल पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे आभार मानले.

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या माध्यमातून यापूर्वी रायगड जिल्हा परिषद अंतर्गत शाळांना ई लर्निंग सिस्टीम, संगणक, ध्वनीक्षेपक, वर्ग बांधून देणे, कपाटे, बोलक्या भिंती रंगवून देणे अशा प्रकारे सहाय्य करण्यात आले आहे. मागच्या वर्षी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने १०० देशी वृक्षांचे रोपण केले,१५० मुलींना "गुड टच बॅड टच" याचे तज्ञांचे माध्यमातून समुपदेशन केले.

चिपळे येथील शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमाला पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, अध्यक्ष राजेंद्र पाटील, सल्लागार मंदार दोंदे, सल्लागार विवेक पाटील, सल्लागार संजय कदम, उपाध्यक्ष दीपक घोसाळकर, सरचिटणीस हरेश साठे खजिनदार दत्ता कुलकर्णी, सन्माननीय सदस्य प्रवीण मोहोकर, आजीव खजिनदार नितीन कोळी, लालचंद यादव, चिपळे माजी उपसरपंच धनंजय पाटील, पराग म्हात्रे अक्षय पाटील, अजय पाटील, शिक्षिका प्रिया भोसले यांची सन्माननीय उपस्थिती होती.

# कोकण रेल्वे प्रवासी सेवा अधिक गतिमान व सुरक्षित होणार

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकण रेल्वे मार्गावरील प्रवासी सेवा अधिक गतिमान आणि सुरक्षित करण्याकरिता कोकण रेल्वे प्रशासनाने विविध उपाययोजना हाती घेतल्या असून, त्याच बरोबर कोकण रेल्वे मार्गाच्या दुपदरीकरणाकरिता कोकण रेल्वे महामंडळाने केंद्र सरकारकडे निधीचा प्रस्ताव सादर केला आहे.

विद्यमान प्रवासी सेवा प्रभावी करण्याकरिता सिग्नल यंत्रणा सक्षम करण्यासाठी ९९.६८ कोटी खर्चून 'कवच' सुरक्षा प्रणाली बसवली जाईल. ११ रेल्वे फाटकांच्या जागी उड्डाणपूल उभारून मानवरहित फाटकांचा प्रश्न २७१.२२ कोटी खर्चून सोडविला जाईल. रेल्वे वहनक्षमता वाढावी म्हणून नवीन क्रॉसिंग स्टेशन तर गोकर्ण रोड, होन्नावर, बारकूर, हरवाडा व अंकोला येथे ४२५.५५ कोटी खर्चून लूप लाईन उभारण्यात येत आहे. तर १०४.९८ कोटीं रुपये खर्च करुन विविध सुविधा दिल्या जातील.

जुन्या ट्रॅक बदलासाठी ३६३.८२ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. भूस्खलनप्रवण २० ठिकाणी जिओ – टेक्निकल स्थिरीकरण, विविध बोगद्यांची देखभाल तसेच ४८ स्थानकांवरील जुन्या इंटरलॉकिंग यंत्रणांच्या जागी इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग प्रणालीसाठी ३०१.२५ कोटींचा प्रस्ताव आहे.

# वावडुंगी ग्रामपंचायत उपसरपंचपदी निलम भुवड

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

मुरूड तालुक्यातील वावडुंगी ग्रामपंचायत उपसरपंच पदाकरीता निवडणूक जाहीर करण्यात आली होती.त्यानुसार शिंदे शिवसेना पक्षांच्या ग्रामपंचायत सदस्य निलम भुवड यांनी आपला उमेदवारी अर्ज वावडुंगी ग्रामपंचायत कार्यालय निवडणूक निर्णय अधिकारी तथा ग्रामसेवक दत्ता नाईक यांच्या कडे सुपूर्त करण्यात आला होता.एकमेव अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा ग्रामसेवक दत्ता नाईक यांनी उपसरपंच पदी निलम भुवड यांची बिनविरोध निवड झाली अशी घोषणा केली.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य विघ्नेश माळी, उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे ,पंचायत समिती सभापती निलेश घाटवल,उपसभापती अश्विनी जंगम वावडूंगी सरपंच ऋतुजा वरणकर, मुरूड तालुका बांधकाम कामगार सेना अध्यक्ष दिनेश मिनमिने ,युवा उपजिल्हाप्रमुख दिपेश वरणकर. निलेश तांबटकर अविनाश शिंदे. योगेश जैस्वाल, गौतमी मोरे, शाईनदा कडू. सुवर्ण भुवड, नितीन भुवड, उषा जळगावकर नितेश वाघमारे आदिंसह पदाधिकारी उपस्थित होते.



# बस वाहकाच्या प्रामाणिकपणामुळे हरवलेली पर्स मिळाली परत

## कैलास इंगळे यांचे सर्वत्र कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुरुड– महाड बसमधून प्रवास करत असताना रसिका शिंदे आणि वैशाली शिंदे या दोघी माणगाव येथून बसमध्ये चढल्या होत्या. रेवदंडा येथे उतरल्यानंतर त्यांना आपली पैशांनी भरलेली पर्स बसमध्येच विसरल्याचे लक्षात आले. या पर्समध्ये सुमारे पाच ते साडेपाच हजार रुपये रोख रक्कम, आधार कार्ड, पॅन कार्ड, एटीएम कार्डसह महत्त्वाची कागदपत्रे होती.


घटनेची माहिती मिळताच रसिका शिंदे यांनी त्यांचे भाऊजी राकेश काठे यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण प्रकार सांगितला. त्यानंतर राकेश काठे यांनी बोर्ली येथे राहणाऱ्या आपल्या मित्राशी संपर्क साधला. संबंधित बस मुरुडहून बोर्लीकडे जात असताना ती थांबवून बसचे वाहक कैलास इंगळे यांच्याकडे पर्सबाबत चौकशी करण्यात आली.

कैलास इंगळे यांनी तत्परता दाखवत संबंधित पर्स सुरक्षित असल्याचे सांगितले. पर्सची ओळख पटवल्यानंतर त्यांनी ती सर्व साहित्यांसह सुखरूप परत केली. रोख रक्कम व महत्त्वाची कागदपत्रे अबाधित अवस्थेत मिळाल्याने शिंदे कुटुंबीयांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

बस वाहक कैलास इंगळे यांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणा आणि कर्तव्यदक्षतेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

**दुखवटा**

## पुष्पलता देसाई



**रोहा:** येथील ज्येष्ठ पत्रकार स्व. दत्तात्रेय तथा राजाभाऊ देसाई यांच्या पत्नी श्रीमती पुष्पलता दत्तात्रेय देसाई यांचे अल्पशा आजाराने १५ जून २०२६ रोजी पुणे येथे दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले एक वकील व दुसरा मुलगा विशेष महानिरीक्षक कारागृह विभाग महाराष्ट्र राज्य, एक मुलगी तसेचं सुना नातवंडे त्याच प्रमाणे जावई पुण्यातील प्रख्यात बांधकाम व्यावसायीक असा परिवार आहे.

## प्रभाग समिती 'ड'मार्फत नवीन पनवेलमध्ये
# अनधिकृत टपऱ्या व चिकन दुकानांवर कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ड'अंतर्गत नवीन पनवेल येथील गणेश मार्केट परिसरातील अनधिकृत टपरीधारकांवर तसेच सेक्टर ०३, नवीन पनवेल येथील अनधिकृत चिकन दुकानांवर आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार तोडक कारवाई करण्यात आली.





अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे आणि उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कारवाई सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी श्रीमती डॉ. रूपाली माने यांच्या उपस्थितीत करण्यात आली. या कारवाईत प्रभाग अधीक्षक राजेश डोंगरे, खांदेश्वर पोलिस स्थानकाचे पोलीस पथक, अतिक्रमण पथक, प्रभाग कार्यालयातील कर्मचारी, रायगड सुरक्षा रक्षक तसेच एम.एस.एफ. सुरक्षा रक्षक यांनी सहभाग घेतला.

सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतरित्या उभारण्यात आलेल्या टपऱ्या व दुकाने यामुळे नागरिकांच्या वाहतुकीस तसेच परिसराच्या स्वच्छतेस अडथळा निर्माण होत असल्याने ही कारवाई करण्यात आली. अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात महानगरपालिकेची कारवाई पुढेही नियमितपणे सुरू राहणार आहे.

# पनवेल रेल्वे पोलिसांचे झिरो मिशन डे अभियान

## प्रवाशांमध्ये रेल्वे सुरक्षेबाबत जनजागृती व अपघातांना आळा घालण्याचा उद्देश

**पनवेल : वार्ताहर**

रेल्वे अपघातांमुळे होणारे मृत्यू आणि जखमींचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने रेल्वे पोलीस आयुक्तालयांतर्गत पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याच्या वतीने बुधवार ( दि.१७ ) झिरो मिशन डे अभियान राबविण्यात आले. प्रवाशांमध्ये रेल्वे सुरक्षेबाबत जनजागृती करून अपघातांना आळा घालण्याचा या अभियानाचा मुख्य उद्देश होता.

पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत आतापर्यंत रेल्वे अपघातांमध्ये सुमारे ३०० जणांचा मृत्यू झाला असून ३३१ जण जखमी झाले आहेत. ही गंभीर बाब लक्षात घेऊन रेल्वे सुरक्षा नियमांचे पालन करण्याबाबत प्रवाशांना मार्गदर्शन करण्यात आले. रेल्वे रुळ ओलांडणे, चालत्या रेल्वेत चढणे किंवा उतरणे, तसेच निष्काळजीपणे प्रवास करणे टाळावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी हे अभियान दर महिन्याला नियमितपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती रेल्वे पोलिसांनी दिली. अभियानात सहाय्यक पोलीस आयुक्त (हार्बर विभाग) नीलिमा कुलकर्णी, पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय तायडे तसेच गोपनीय शाखेचे अंमलदार जाकीर शेख, अमोल पालवे आणि सतीश अंबी उपस्थित होते. नागरिक व प्रवाशांनीही या उपक्रमास सकारात्मक प्रतिसाद दिला.



# खुटारी, तुर्भे आणि सिद्धी करवले गावातील जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्याचे वाटप

**पनवेल : प्रतिनिधी**

खुटारी, तुर्भे आणि सिद्धी करवले गावातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांतर्गत गणवेश, पुस्तके, वह्या आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. पनवेल महापालिकेच्या नगरसेविका लीना म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमास रोहिंजन ग्रामपंचायतीचे माजी सरपंच नंदकुमार म्हात्रे यांच्यासह ग्रामस्थ आणि शिक्षक उपस्थित होते. शाळा प्रवेशाच्या दिवशी शैक्षणिक साहित्य मिळाल्याने यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.



शाळेत आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना नवीन गणवेश व शैक्षणिक साहित्य वितरित करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची उपलब्धता होऊन त्यांच्या शिक्षणाला चालना मिळणार आहे. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या शासनाच्या प्रयत्नांना बळ मिळाले आहे.

# सीकेटीच्या अक्षराची नृत्यकलेत चमकदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सी के टी च्या अक्षरा प्रवीण सुर्यवंशी हिने अखिल नटराजम अंतर संस्कृती संघ , आंतरराष्ट्रीय नृत्य परिषद CID, पॅरिस-फ्रान्सच्या पंजीम, गोवा येथे आयोजित सोलो आणि ड्युएट लोकनृत्य राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धेत द्वितीय पारितोषिक पटकावले आहे .




ती गेल्या ७ वर्षांपासून लोकनृत्याचे प्रशिक्षण घेत आहे. तिने १६ जून रोजी महाराष्ट्र सखी आयोजित कला तुमची साथ आमची नृत्य स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक आणि ₹ १०००/- चे रोख पारितोषिक देखील जिंकले. तिने अनाथाश्रमाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वार्षिक दिवसासाठी नृत्यदिग्दर्शन केले आणि त्यासाठी ज्येष्ठ अभिनेत्री 'अलका कुबल' यांच्याकडून तिचा सत्कार करण्यात आला.

सिमला, हैदराबाद, पुणे, मुंबई, गोवा आणि नेपाळ येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धा सोलो आणि ड्युएट लोकनृत्यामध्ये जिंकल्या आहेत. व्यावसायिक लोकनर्तक बनण्याची आणि आपल्या भारतीय लोकनृत्याचा जगभरात प्रसार करण्याची तिची महत्त्वाकांक्षा आहे आणि तिची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी सर्व प्रकारे पाठिंबा देण्यासाठी तिने तिच्या शाळेचे आभार मानले आहेत . सदर विद्यार्थिनीचे शाळेचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण सर , नवनिर्वाचित मुख्याध्यापिका स्वाती काळे मॅडम , पर्यवेक्षिका , सर्व शिक्षक यांनी कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## निवडक

### सोन्याची चेन खेचून चोरटा पसार

**नवीन पनवेल :** पायी चालत जाणाऱ्या फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याची चैन खेचून चोर मोटरसायकल वरून पसार झाले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात १६ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.यातील फिर्यादी हे व्हिके हायस्कूल ते पुणे मुंबई हायवेवर फुटपाथवरून पायी चालत जात होते. वडाळा तलावाच्या बाजूला असलेल्या नंदनवन सोसायटीच्या समोर आले असता त्यांच्यासमोर हेल्मेट घातलेला इसम आला. त्यांनी फिर्यादीच्या गळ्यातील चेन खेचून बाजूला उभे असलेल्या मोटरसायकल वरून ते हायवेच्या दिशेने पळून गेले.पनवेल पोलिस सदर गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

### दोन कोटी ६४ लाख १८ हजार रुपयांच्या दागिन्यांची बॅग चोरली

**नवीन पनवेल :** टूर्स अँड ट्रॅव्हल्समधून प्रवास करत असताना अनोळखी ईसमाने दोन कोटी ६४ लाख १८ हजार रुपये किमतीचे दागिन्यांची बॅग चोरून नेल्या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात १७ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी विक्रमसिंग लाखसिंग हे काळबादेवी, मुंबई येथे राहत असून ते १५ जून रोजी त्यांचे साथीदार हेमराज सुतार असे दोघेजण डॉल्फिन टूर्स अँड ट्रॅव्हल्स या कंपनीच्या बसमधून प्रवास करत होते. सीट क्रमांक सात आणि आठ मधून विजापूर कर्नाटक ते पुणे मुंबई एक्सप्रेस हायवे संपल्यानंतर कळंबोली मॅकडोनाल्डच्या समोर पुणे मुंबई लेनवर प्रवास करत असताना अज्ञात इसमाने त्यांच्या ताब्यातील दागिन्यांची असलेली बॅग चोरून नेली. यात सोन्याचे विविध प्रकारचे दागिने, अंगठ्या, पेंडल, लॉकेट, बाळ्या ,टॉप्स, मंगळसूत्र यांचा समावेश आहे. कळंबोली पोलिस गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

### महिलेच्या घरात घुसून अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न

**नवीन पनवेल :** महिलेच्या घरात घुसून आरोपीने अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपी गोल्या उर्फ संतोष साहेबराव चव्हाण याच्या विरोधात १६ जून रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. १५ जून रोजी संध्याकाळी साडेसात वाजता पीडित महिला त्यांच्या घरात बसलेल्या होत्या आणि त्यांचे पती घरात झोपले होते. यावेळी गोल्या उर्फ संतोष चव्हाण याने पीडित महिलेच्या घरात घुसून त्यांचा हात पकडला आणि जवळ ओढून अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या पतीला मारहाण केली. आणि पीडित महिलेच्या पोटात लाथ मारली. खांदेश्वर पोलिस गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत.

### चाकूचा धाक दाखवून केला बलात्कार

**नवीन पनवेल :** चाकूचा धाक दाखवून महिलेवर वारंवार बलात्कार केल्याप्रकरणी आरोपी रोशन लहू शेळके (राहणार आदई गाव) याच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात १६ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. नोव्हेंबर २०२५ ते एप्रिल २०२६ पर्यंत रोशन शेळके याने पीडित महिलेला मोबाईलमध्ये अश्लील व्हिडिओ दाखवली आणि चाकूचा धाक दाखवून तीच्यावर अनेकदा अत्याचार केला आणि चाकू दाखवून व्हिडिओ काढून घेतला आणि ते व्हिडिओ पीडित महिलेच्या वडिलांना दाखवण्याची धमकी देऊन पुन्हा अत्याचार केला.

# पथविक्रेत्यांनी पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या दीनदयाळ अंत्योदय योजनाराष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM) विभागामार्फत पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना (PMSVANidhi) अंतर्गत पथविक्रेत्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. पात्र पथविक्रेत्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे केले आहे.

कोविड-१९ महामारीमुळे पथविक्रेत्यांच्या उत्पन्नावर मोठा परिणाम झाला होता. त्यांना पुन्हा व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक मदत मिळावी या उद्देशाने केंद्र शासनाने जून २०२० मध्ये पीएम स्वनिधी योजना सुरू केली. ही योजना नागरी भागातील पथविक्रेत्यांसाठी असून जून २०३० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत पथविक्रेत्यांना खेळते भांडवल कर्ज स्वरूपात उपलब्ध करून दिले जाते. पहिल्या टप्प्यात ₹१५,००० पर्यंत, दुसऱ्या टप्प्यात ₹२५,००० पर्यंत आणि तिसऱ्या टप्प्यात ₹५०,००० पर्यंत कर्ज दिले जाते. कर्जाची परतफेड अनुक्रमे १२, १८ आणि ३६ महिन्यांत करायची आहे. वेळेत कर्जफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना पुढील टप्प्यातील कर्जासाठी पात्रता मिळते.



या योजनेंतर्गत कर्जाचा लाभ घेणाऱ्या पथविक्रेत्यांना विहीत कालावधीमध्ये निर्धारित कालावधीत कर्जफेड केल्यास ७ टक्के व्याज अनुदान मिळण्यास पात्र राहतील.

पनवेल महानगरपालिकेमार्फत ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, कर्ज प्रस्तावांची पडताळणी, बँकांशी समन्वय, सामाजिक-आर्थिक प्रोफाइलिंग तसेच विविध कल्याणकारी योजनांशी जोडणी यांसारखी कार्यवाही केली जात आहे. तसेच पथविक्रेत्यांच्या कुटूंबाचे स्वनिधी से समृध्दी योजनेंअंतर्गत सामाजिक-आर्थिक प्रोफाइलिंग करुन केंद्राच्या विविध कल्याणकारी योजनांशी त्यांना जोडून देणे.दुसऱ्या कर्जाची नियमितपणे परतफेड करुन तिसरे कर्ज मिळण्यास पात्र पथविक्रेत्यांना क्रेडीट कार्ड सुविधेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यास सहकार्य केले जात आहे. अधिक माहितीसाठी इच्छुक पथविक्रेत्यांनी पनवेल महानगरपालिका, डेएनयुएलएम विभाग, दुसरा मजला, विलासराव देशमुख शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल येथे संपर्क साधावा असे आवाहन पालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

**योजनेची उद्दीष्टये**

१. पथविक्रेत्यांची ओळख निर्माण करणे.
२. पथविक्रेत्यांना कर्ज स्वरुपात खेळते भांडवल उपलब्ध करणे.
३. पथविक्रेत्यांना UPI संलग्न क्रेडीट कार्ड उपलब्ध करणे.
४. पथविक्रेत्यांनाच्या डिजिटल व्यवहारात प्रोत्साहन देणे.
५. पथविक्रेत्यांची क्षमता बांधणी करणे.
६. पथविक्रेत्यांना सामाजिक सुरक्षा योजनेशी संलग्न करणे.

# जि.प.शाळेमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना घरपट्टीमध्ये ५० टक्के सवलत

## चिंध्रण ग्रामपंचायतीचा स्तुत्य उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायतीने स्तुत्य उपक्रम राबवून जिल्हा परिषद शाळेमध्ये पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या घरपट्टीमध्ये ५०% सवलत देणार असल्याचे जाहीर केले आहे.



नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी जिल्हा परिषद शाळा चिंध्रण येथे इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेतलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे भव्य आणि उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. मिरवणूक काढून, फुलांचा वर्षाव करत आणि शुभ पावलांचे ठसे घेऊन या विद्यार्थ्यांचा ज्ञानमंदिरात प्रवेश सोहळा मोठ्या आनंदात पार पडला.या प्रसंगी चिंध्रण गावचे सरपंच एकनाथ पाटील, उपसरपंच मनोज कुंभारकर, सदस्य जीवन पाडेकर, ग्रामविकास अधिकारी ईश्वर पवार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सौ. जागृती पाटील , उपाध्यक्ष राम पाटील, शाळेचे मुख्याध्यापक जाधव सर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी पालकवर्ग आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची घरपट्टीमध्ये ५० टक्के सवलत देण्याचे सरपंच एकनाथ पाटील यांनी जाहिर केले.

# पनवेल महानगरपालिकेत महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त अभिवादन!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


पनवेल महानगरपालिका मुख्यालयात आज महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या शौर्य, पराक्रम आणि राष्ट्रनिष्ठेला अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमास महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, महापालिकेचे सन्मानीय सदस्य दर्शना भोईर, लतीफ शेख, गणेश कडू, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, जनसंपर्क अधिकारी नितीन साके, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी तसेच विविध विभागांतील प्रतिनिधी उपस्थित होते.











**पनवेल :** नवनिर्वाचित कोकण विभाग विधान परिषद सदस्य अनिकेत तटकरे यांनी बुधवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यांना माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी 'रामपर्व'ची प्रत दिली. यावेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख व आदेश ठाकूर उपस्थित होते.

## संपादकीय

# आत्मपरीक्षणाची गरज

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठी घडामोड घडण्याची जोरदार चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. उबाठा गटातील काही खासदार शिंदे गटाच्या संपर्कात असल्याच्या चर्चेमुळे उबाठा गटाला मोठा धक्का बसलेला दिसत असून उबाठाच्या नेतेमंडळींकडून आक्रस्ताळे आरोप सुरू झाले आहेत. एखाद्या पक्षातील लोकप्रतिनिधी मोठ्या प्रमाणात दुसऱ्या राजकीय प्रवाहाकडे वळत असतील तर खरे तर त्या पक्षाच्या नेतृत्वाने आत्मपरीक्षण करण्याची गरज असते. राजकारणाचा भाग म्हणून नरेटिव्ह तयार करण्याच्या या अवघ्या खटाटोपांपासून भारतीय जनता पक्ष मात्र दूर आहे.

**शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी २०२२ साली उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाविरुद्ध बंड केले होते. आता चार वर्षांनी त्या बंडाची पुनरावृत्ती होणार असल्याची जोरदार चर्चा गेले काही दिवस राज्यात सुरू आहे. उबाठा गटातील सहा खासदारांनी दिल्लीत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेऊन स्वतंत्र गट स्थापन करण्याचे पत्र सादर केल्याचे दावे बुधवारी माध्यमांमध्ये केले गेले. मंगळवारी रात्रीपासून ठाकरे गटातील काही खासदार दिल्लीत दाखल होत असल्याची चर्चा सुरू होती. मात्र अधिकृतपणे या घडामोडींना बुधवारी संध्याकाळपर्यंत कुठलाही दुजोरा मिळालेला दिसत नव्हता. परंतु विशिष्ट उबाठा नेते मात्र नेहमीप्रमाणे सकाळपासून आक्रस्ताळेपणाने कोट्यवधींच्या खोक्यांचे आरोप करताना दिसत होते. गेले काही दिवस चर्चेत असलेल्या या 'ऑपरेशन टायगर'च्या संदर्भात विविध दावे-प्रतिदावे समोर आले आहेत. उबाठाच्या खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत लोकसभा अध्यक्षांची भेट घेत स्वतंत्र गट स्थापन करण्याचा दावा केला असेही माध्यमांमधून सांगितले गेले. परंतु शिंदे गटाच्या राज्यातील प्रवयाने मात्र आपल्याला या साऱ्या घडामोडींबद्दलची माहिती उबाठा नेते संजय राऊत यांनी माध्यमांसमोर केलेल्या आरोपांतूनच मिळाली असे सांगितले. पक्षांतरबंदी कायद्यानुसार कोणत्याही संसदीय पक्षात स्वतंत्र गटाला मान्यता मिळण्यासाठी दोन तृतियांश सदस्यांचे समर्थन आवश्यक असते. त्यामुळे उबाठाच्या सहा खासदारांनी स्वतंत्र भूमिका घेतल्याने आवश्यक संख्याबळ पूर्ण झाल्याचा दावाही करण्यात येत आहे. पुढील टप्प्यात हा गट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत विलीन होण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे. या साऱ्या दाव्यांच्या पार्श्वभूमीवर उबाठाच्या संघटनात्मक ताकदीवर मात्र पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. खासदारांनंतर आमदार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पदाधिकारीही पक्ष सोडू शकतात का याचीही चर्चा सुरू झाली आहे. अशा प्रत्येक घडामोडीला पक्षफोड किंवा ऑपरेशन संबोधून जनतेसमोर भावनिक चित्र निर्माण करण्यापेक्षा पक्षाच्या नेतृत्वाने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. निव्वळ इतरांवर आरोप करण्यातून काय साध्य होणार? अशा परिस्थितीत आपल्या संघटनात्मक आणि राजकीय मर्यादांचा विचार करणे आवश्यक नाही का? लोकप्रतिनिधी टिकवून ठेवण्यात अपयश येत असेल तर संबंधित पक्षाच्या नेतृत्वाने त्यामागील कारणे शोधायला हवीत. भारतीय जनता पक्षाने सत्तेवर आल्यापासून देशात विकासकेंद्रित राजकारणाची नवी दिशा दिली आहे. पायाभूत सुविधा, डिजिटल अर्थव्यवस्था, राष्ट्रीय सुरक्षेवर दिलेला भर आणि सामाजिक कल्याणाच्या विविध योजना यामुळे भाजपचा जनाधार सातत्याने वाढतो आहे. महाराष्ट्रातही महायुती सरकारने विकासकामांना नजरेत भरण्यासारखी गती दिली आहे. परिणामस्वरूपी, अनेक लोकप्रतिनिधींना या विकासप्रवाहाचा भाग बनावेसे वाटणे स्वाभाविक आहे. मतदारही विकास, स्थैर्य आणि प्रभावी प्रशासनालाच पसंती देत आहेत हे लक्षात घेण्याची गरज आहे.**

# अल निनो संकटात शेतकऱ्यांची सतर्कता आवश्यक

अल निनो हा शब्द महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांनी समजून घेणे आवश्यक आहे. अल निनो हे एक वातावरणीय संकट असून आता या संकटाच्या आम्ही जवळ असून याचा सर्वाधिक परिणाम जून मध्ये मृग आणि रोहिणी नक्षत्रावर झाला आहे. तो पुढेही होऊ शकतो. त्यामुळे या लेखात, चला! अल निनो या वातावरणातील बदलाच्या संकटाला सोप्या भाषेत समजून घेऊया ! राज्यातील शेतकऱ्यांनी हे बदल समजून घेऊन हवामान व कृषी खात्याच्या सूचनांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे तसेच सर्वसामान्य नागरिकांनी देखील या संदर्भात पुढील काळाचे नियोजन करणे आवश्यक आहे. चला! सोप्या भाषेत हा विषय समजून घेऊया!

हवामान बदल, वाढते तापमान, अनियमित पर्जन्यमान आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे शेती क्षेत्रासमोर नवी आव्हाने उभी राहत आहेत. या आव्हानांमध्ये अल निनो ही जागतिक हवामानाशी संबंधित घटना विशेष महत्त्वाची मानली जाते. जागतिक हवामान संघटना, भारत हवामान विभाग, संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना आणि विविध संशोधन संस्थांच्या अभ्यासानुसार अल निनोचा प्रभाव केवळ हवामानापुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचा परिणाम शेती, जलसंपदा, पशुधन, आरोग्य, जैवविविधता आणि अर्थव्यवस्थेवरही होतो. त्यामुळे या घटनेचे स्वरूप समजून घेणे आणि त्यासाठी पूर्वतयारी करणे अत्यंत आवश्यक आहे.

**अल निनो म्हणजे काय?**

अल निनो हा स्पॅनिश शब्द असून त्याचा अर्थ लहान मुलगा असा होतो. वैज्ञानिक भाषेत सांगायचे झाल्यास, प्रशांत महासागराच्या मध्य आणि पूर्व भागातील समुद्रपृष्ठाचे तापमान सरासरीपेक्षा जास्त वाढते, तेव्हा अल निनो स्थिती निर्माण होते. ही घटना ENSO (El Nio Southern Oscillation) या जागतिक हवामान प्रणालीचा भाग आहे.

आता हे कसे होते हे जाणून घेऊया! समुद्रातील तापमानातील या बदलांमुळे जगभरातील वाऱ्यांचे प्रवाह, ढगांची निर्मिती आणि पर्जन्यमानाचे स्वरूप बदलते. त्यामुळे काही भागात दुष्काळ, तर काही भागात अतिवृष्टीसारख्या घटना घडू शकतात.

**अल निनो दरवर्षी येतो का?**

नाही. जागतिक हवामान संघटनेच्या माहितीनुसार अल निनो साधारणतः दर दोन ते सात वर्षांनी उद्भवतो. त्याचा कालावधी साधारण नऊ महिने ते एक वर्ष किंवा काही वेळा त्याहून अधिक असू शकतो. प्रत्येक अल निनोची तीव्रता आणि परिणाम सारखेच असतील असे नाही.

**भारतावर यापूर्वी काय परिणाम झाला?**

भारतातील शेतकरी, पर्यावरण तज्ञ, जलतज्ञ, वनतज्ञ, कृषी तज्ञांसाठी अल निनो हा शब्द आता अपरिचित राहिलेला नाही. भारतातील मान्सून आणि अल निनो यांचा संबंध अनेक दशकांपासून अभ्यासला जात आहे. १९८२, १९८७, २००२, २००९ आणि २०१५ या वर्षांमध्ये भारताने कमी पावसाचा अनुभव घेतला होता. विशेषतः २००२ आणि २००९ मध्ये देशातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे गेल्या वर्षी जसा तुफान पाऊस झाला किंवा त्या वर्षापूर्वीही जसा पूरक पाऊस झाला तसा पाऊस यावर्षी नाही ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे.

तथापि, हवामान तज्ञ स्पष्ट करतात की प्रत्येक अल निनो वर्षात दुष्काळ पडेलच असे नाही. भारतीय महासागरातील तापमान, अरबी समुद्रातील स्थिती, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाची क्षेत्रे आणि इतर हवामान घटकही मान्सूनवर प्रभाव टाकतात.

**हवामान तज्ज्ञांचे काय मत आहे?**

जागतिक हवामान संघटना, भारत हवामान विभाग, संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटन आणि इतर संशोधन संस्थांच्या मते अल निनो हा जागतिक हवामान व्यवस्थेतील नैसर्गिक भाग आहे, मात्र जागतिक तापमानवाढीमुळे त्याचे परिणाम अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हवामान तज्ञांच्या मते अल निनोमुळे जागतिक सरासरी तापमान वाढू शकते. उष्णतेच्या लाटांची तीव्रता वाढू शकते. काही भागात दुष्काळ तर काही भागात अतिवृष्टी होऊ शकते. अन्नसुरक्षा आणि जलसुरक्षेवर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत पेरणीच्या नियोजनासाठी हवामान अंदाजांचे महत्त्व अधिक वाढते.

**'अल निनो 'परिणाम रोखण्यासाठी प्रयत्न**

अल निनो ही नैसर्गिक महासागरीय घटना आहे, त्यामुळे यावर्षी अनेक बाबतीत अनियमितता घडू शकते. अशा परिस्थितीत परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जातात. साधारणतः अशावेळी शासन स्तरावर हवामानाचा सतत अभ्यास आणि पूर्वसूचना प्रणाली विकसित व कार्यक्षम केली जाते, जलसंधारण प्रकल्प राखीव ठेवले जातात. पीक विमा योजनेचा लाभ घेण्याचे सुचविले जाते. दुष्काळ व्यवस्थापन आराखडे तयार केले जातात, सूक्ष्म सिंचनाला प्रोत्साहन दिले जाते, हवामान आधारित कृषी सल्ला सेवा दिली जाते, बियाणे व चारा उपलब्धतेचे नियोजन करणे, जलाशय व्यवस्थापन आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन या काळात शासनामार्फत केले जाते.

**शेतकऱ्यांनी काय करावे**

शासन स्तरावर हे सर्व निर्णय घेतले जात असताना आपल्या शेतकऱ्यांनी या परिस्थितीत काय करावे यासंदर्भात कृषी तज्ञांनी मार्गदर्शन केले आहे. कृषी तज्ञांच्या मते अल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून शेतकऱ्यांनी पुढील बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

१. हवामान अंदाजांवर लक्ष ठेवावे.

भारत हवामान विभाग आणि कृषी विभागाच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे.

२. पीक निवडीचे नियोजन करावे.

कमी कालावधीत येणारी आणि कमी पाण्यात तग धरणारी पिके निवडण्याचा विचार करावा.

३. जलसंधारणाला प्राधान्य द्यावे.

शेततळे, बांधबंदिस्ती, पावसाचे पाणी साठवणे, चर निर्माण करणे, शेत व शेत रस्त्याच्या मध्ये पाणी साठवणे, ओलसरपणा राहिली, मूलस्थानी जलसंधारणासाठी प्रयत्न करणे.

४. उपलब्ध जलस्तोत्रातून फक्त सूक्ष्म, ठिबक आणि तुषार सिंचनाद्वारे पाण्याचा कार्यक्षम वापर करणे.

५. पीक विमा घ्यावा. नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळण्यासाठी हे सर्वात आवश्यक आहे.

६. पशुधन व्यवस्थापन

चारा आणि पाण्याची उपलब्धता याचे पूर्वनियोजन करणे आवश्यक आहे.

७. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कृषी विभागाने सांगितल्याशिवाय पेरणी न करणे, कारण या स्थितीत दुबार, तिबार पेरणीची शक्यता असते.

**सामान्य नागरिकांनी काय करावे?**

अल निनोचा परिणाम केवळ शेतकऱ्यांवरच होतो असे नाही, तर या वातावरणाच्या बदलातून सर्वसामान्य प्रत्येक नागरिकाला जावे लागणार आहे. त्यामुळे हा अल निनो काय हे प्रत्येकाने जाणून घेणे आवश्यक आहे. सामान्य नागरिकांनी अशा परिस्थितीत, पाण्याची बचत करावी,वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करावे. स्थानिक जलस्त्रोतांचे संरक्षण करावे. उष्णतेच्या लाटांपासून बचावासाठी आवश्यक काळजी घ्यावी. पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करावा.

**भारतातील कोणती राज्ये अधिक संवेदनशील?**

अल निनोच्या काळात पावसातील तफावत सर्वाधिक जाणवणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड यांचा उल्लेख केला जातो. तथापि, प्रत्येक वर्षी परिस्थिती वेगळी असू शकते. त्यामुळे या प्रदेशावर अधिक लक्ष भारतीय हवामान खात्याने केले असून त्या दृष्टीने नियोजन सुरू आहे.

मृग बरसला नाही म्हणजे अल निनोचा प्रभाव हे उत्तर सध्या नाही असे आहे. कारण भारतात अनेक वेळा उशिरा पावसाला सुरुवात होते. भारतीय हवामान विभागाच्या मते मान्सूनचे आगमन आणि त्यातील खंड अनेक घटकांवर अवलंबून असतात. अरबी समुद्रातील परिस्थिती, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाची क्षेत्रे, पश्चिमी वारे, स्थानिक तापमान आणि इतर महासागरीय घटक यांचाही प्रभाव असतो.

म्हणूनच जून महिन्यात काही दिवस पाऊस उशिरा येणे किंवा खंड पडणे यामागे केवळ 'अल निनो 'च कारणीभूत आहे, असे निश्चितपणे म्हणता येत नाही. तथापि यासंदर्भात हवामान शास्त्रज्ञांनी यावर्षी पाऊस उशिरा होईल अशी सूचना केली आहे. 'अल निनो ' च्या प्रभावाबाबत काही कालावधीनंतर हवामान खाते मत व्यक्त करणार आहे तथापि,पाऊस उशिरा येणार हे निश्चित.त्यामुळे, अधिकृत हवामान विभागाच्या निरीक्षणांवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे.

थोडक्यात अल निनो ही जगभर परिणाम घडवणारी नैसर्गिक हवामान घटना असली तरी ती अटळ संकट नाही. विज्ञानाधारित नियोजन, अचूक हवामान अंदाज, जलसंधारण, आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि शासन-जनसहभाग यांच्या मदतीने तिच्या परिणामांची तीव्रता मोठ्या प्रमाणात कमी करता येते. शासनाकडून होणाऱ्या वेळोवेळी सूचना भीती निर्माण करण्यासाठी नाहीत. तर जागरूकता वाढविण्याची आहे. शाश्वत जलव्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण आणि हवामान अनुकूल शेती हीच अल निनोसारख्या आव्हानांना सामोरे जाण्याची सर्वात प्रभावी दिशा ठरू शकते. त्यामुळे शेतीच्या कोणत्याही कामाला सुरुवात करण्यापूर्वी कृषी विभागाच्या व हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी त्यासाठी सतर्क असणे सर्वात महत्त्वाचे आहे.

**-प्रवीण टाके, उपसंचालक (माहिती)**



## बदलते तंत्रज्ञान

### रात्रभर एसी चालू ठेवून झोपता? सावधान!

रात्रभर सलग एसी चालवल्याने तो लवकर खराब होतो का? योग्य तापमान कोणते? आणि खिसा रिकामा करणारे लाईट बिल कसे नियंत्रणात ठेवावे? या प्रश्नांची उत्तरे प्रत्येक एसी वापरकर्त्याने जाणून घेणे अत्यंत गरजेचे आहे. अनेक जणांना असे वाटते की रात्रभर एसी चालवल्याने मशीनवर ताण येतो आणि ते खराब होते. मात्र, तंत्रज्ञांच्या मते तसे अजिबात नाही. दिवसाच्या तुलनेत रात्रीच्या वेळी बाहेरील तापमान कमी असते. तसेच सूर्यप्रकाश नसल्यामुळे वातावरणात फारसा उकाडा जाणवत नाही. अशा परिस्थितीत एसीच्या कॉम्प्रेसरवर जास्त भार पडत नाही. त्यामुळे रात्रभर एसी चालवणे पूर्णपणे सुरक्षित असून यामुळे मशीनचे थेट कोणतेही नुकसान होत नाही.



रात्रभर एसी चालवणे ही समस्या नाही, तर त्याची काळजी न घेणे हा खरा धोका आहे! जर तुम्ही वेळेवर एसीची सर्व्हिसिंग करत नसाल, तर मात्र मोठी समस्या निर्माण होऊ शकते. दीर्घकाळ सर्व्हिसिंग न केल्यामुळे एसीच्या फिल्टरमध्ये धूळ आणि घाण जमा होते. यामुळे खोली थंड होण्यासाठी नेहमीपेक्षा दुप्पट वेळ लागतो. परिणामी, कॉम्प्रेसरला जास्त ताण घेऊन काम करावे लागते. हा ताण जर रोजच पडत राहिला, तर एसीचे पार्ट्स लवकर खराब होतात आणि मशीन अचानक बंद पडू शकते.

अनेकांना सवय असते की खोली लवकर थंड व्हावी म्हणून ते एसी थेट १६ किंवा १८ डिग्री सेल्सिअसवर सेट करतात. हीच ती मोठी चूक आहे जिथे तुमचे लाईट बिल रॉकेटसारखे वाढते! इतक्या कमी तापमानावर खोली थंड करण्यासाठी कॉम्प्रेसरला रात्रभर ओव्हरटाईम करावा लागतो. यामुळे विजेचा वापर प्रचंड वाढतो आणि महिन्याअखेरीस वीज बिल पाहून डोळे पांढरे होण्याची वेळ येते.

एसी उत्पादक आणि उर्जा तज्ज्ञांच्या मते, एसी चालवण्यासाठी २४ डिग्री सेल्सिअस हे तापमान सर्वात उत्तम आणि आदर्श मानले जाते. या तापमानावर खोलीत योग्य आणि सुखावह गारवा तयार होतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, २४ डिग्रीवर कॉम्प्रेसरवर अतिरिक्त भार पडत नाही, ज्यामुळे विजेची मोठी बचत होते आणि तुमच्या एसीचे आयुष्यही वाढते.

# भारतीय महिला शास्त्रज्ञ कमला सोहोनी



**निमित्त**

कमला सोहोनी (१८ जून १९११ - २८ जून १९९८) या भारतातील पहिल्या विद्यावाचस्पती (पीएचडी) पदवीधारक शास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत.

ब्रिटीश अंकित राष्ट्रातली एक हिंदुस्थानी मुलगी म्हणून त्यांना आपल्या शिक्षणासाठी संघर्ष करावा लागला. इसवी सन १९३३मध्ये रसायनशास्त्र हा विषय घेऊन त्या पहिल्या वर्गात बी.एस्सी.ची परीक्षा उत्तीर्ण झाल्या. त्यांनी वर्तमानपत्रातीत जाहिरातीनुसार शास्त्रीय संशोधनासाठी बंगलोर येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'मध्ये अर्ज केला. टाटांनी १९११ मध्ये स्थापन केलेल्या या संस्थेत प्रवेश मिळणे अत्यंत प्रतिष्ठेचे समजले जाई. प्रवेशासाठी कमलाबाई पूर्णपणे पात्र होत्या, परंतु संस्थेचे प्रमुख, नोबेल पारितोषिक विजेते सर सी.व्ही. रामन यांनी मुलगी असल्याने प्रवेश देता येत नाही असे कमलाबाईंना कळविले. कमलाबाई श्री. रामन यांना प्रत्यक्ष भेटल्या व मुलगी म्हणून माझ्यावर होणारा अन्याय मी कदापि सहन करणार नाही आणि इथे राहून मी संशोधन करून एम.एस्सी. होणारच, असे ठामपणे सांगितले. रामन यांनी कमलाबाईंच्या हट्टास्तव त्यांना एका वर्षासाठी प्रवेश दिला.मग वर्षभर कमलाबाईंनी बायोकेमिस्ट्री या विषयाचा झपाटून अभ्यास केला. वर्षअखेर रामन त्यांना म्हणाले. तुमची निष्ठा आणि चिकाटी पाहून असे वाटते की, यापुढे संस्थेत फक्त मुलींनाच प्रवेश द्यावा.

पुढे १९३७मध्ये मुंबई विद्यापीठाच्या स्प्रिंगर रिसर्च आणि सर मंगलदास नथूभाई या शिष्यवृत्त्या मिळवून कमला सोहोनी इंग्लंडला गेल्या. तिथे, नोबेल पारितोषिकविजेते सर फ्रेड्रिक गॉलन्ड हॉपकिन्स यांना भेटून, संस्थेत प्रवेश देण्याची विनंती केली. त्यावर त्यांनी माझ्या प्रयोगशाळेतील सर्व जागा भरल्या आहेत, तुलाच जागा मोकळी दिसली तर सांग असे सांगितले. कुणाचीच ओळख नसल्याने बाई हताश झाल्या, तेव्हाच तेथील एक शास्त्रज्ञ डॉक्टर रिक्टर यांनी त्यांना आपली जागा देऊ केली. दिवसा त्या जागेवर, सकाळी आठ ते संध्याकाळी पाचपर्यंत बाई काम करीत, आणि रात्री डॉ. रिक्टर. पहिले सत्र संपायला केवळ दोन-तीन दिवस बाकी असताना कमलाबाईंनी केंब्रिज विद्यापीठात प्रवेश घेतला आणि 'प्राणिमात्रांप्रमाणे सर्व वनस्पतीतीलही साऱ्या जीवनक्रिया 'सायटोक्रोन-सी'च्या मध्यस्थीने एन्झाइम्समुळे होतात, हे मूलभूत महत्त्वाचे संशोधन सादर करून १९३९ साली केंब्रिज विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी.) ही पदवी संपादन केली. इतरांचे प्रबंध हजार-पंधराशे पानांचे असताना, कमलाबाईंचा प्रबंध अवघ्या ४० पानांचा होता आणि तो त्यांनी त्यावेळी एका व्याख्यानाद्वारे सभागृहापुढे ठेवला.

यानंतर अनेक शास्त्रज्ञाच्या आग्रहामुळे पुढील संशोधनासाठी इंग्लंडमध्ये न राहाता डॉ कमलाबाई मायभूमीच्या प्रेमाने भारतात परत आल्या. दिल्लीच्या लेडी हार्डिंग्ज कॉलेज व पुढे मुंबईच्या (रॉयल) इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या संस्थेत त्यांनी काम केले. मुंबईच्या याच संस्थेच्या निदेशक म्हणून त्या निवृत्त झाल्या. भारतीय विज्ञान संस्था, मुंबई, भारतः कडधान्यांमधील ट्रिप्सीन इनहिबिटर्स. आरे दूध कॉलनीतील दूध, गुरांचे गवत, वासरांचा आहार, धानआट्यातील पौष्टिक घटक, नीरा या पेयातील उपयुक्त घटक, त्यांचे माणसांवर परिणाम. नीरा संशोधनाबद्दल त्या वर्षीच्या सर्वोत्कृष्ट संशोधनाबद्दलच राष्ट्रपती पारितोषिक मिळाले. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### सतत तोंड येत असेल, तर करा हे उपाय...

तोंड येणे किंवा जिभेवर फोड येणे ही अनेकांना वारंवार भेडसावणारी समस्या आहे. जिभेवर, ओठांच्या आतील बाजूस किंवा हिरड्यांवर छोटे पांढरे किंवा लालसर फोड येतात. त्यामुळे खाणे-पिणे, बोलणे आणि अगदी पाणी पिणेसुद्धा त्रासदायक होऊ शकते. शरीरातील उष्णता वाढणे, तणाव, झोपेची कमतरता, पोषणतत्त्वांची कमतरता किंवा तिखट पदार्थांचे जास्त सेवन यामुळे ही समस्या उद्भवू शकते. तुम्हालाही जर सतत असे होत असेल तर आहारात काही पदार्थांचा समावेश करा.



तोंड आल्यावर सर्वप्रथम भरपूर पाणी पिण्याकडे लक्ष द्या. शरीर हायड्रेटेड राहिल्यास फोडांची जळजळ कमी होण्यास मदत होते. थंड पाणी किंवा नारळपाणीही आराम देऊ शकते. थंडावा देणारे आणि पाणीयुक्त पदार्थ आहारात घ्यायला सुरवात करा. कोमट पाण्यात थोडे मीठ घालून दिवसातून दोन ते तीन वेळा गुळण्या केल्यास फोडांमधील वेदना आणि सूज कमी होण्यास मदत होते. हा सर्वात सोपा आणि प्रभावी घरगुती उपाय मानला जातो. थेट मीठ लावणे टाळा. प्रचंड आग होते. मात्र मीठातील गुणधर्म जंतूनाशक असतात त्यामुळे जास्त पाणी-थोडे मीठ हे प्रमाण ठेवा आणि गुळण्या करा.

तुळशीची काही पाने चावून खाल्ल्यानेही फायदा होऊ शकतो. तुळशीमध्ये असलेले गुणधर्म तोंडातील संसर्ग कमी करण्यास मदत करतात. पाने चघळून खा आणि नंतर थोडे पाणी प्या. पानाचा प्रत्येक भाग पोटात जाईल आणि त्याआधी रस तोंडात फिरेल याची काळजी घ्या.

मधाचा वापरही उपयुक्त ठरू शकतो. फोडांवर थोडासा शुद्ध मध लावल्यास जळजळ कमी होण्यास मदत होते आणि फोड लवकर भरून येण्यास सहाय्य मिळते, मात्र मध उष्ण असते त्यामुळे कमी प्रमाणातच लावा. तोंड आले असताना खूप तिखट, आंबट, गरम किंवा मसालेदार पदार्थ खाणे टाळावे. अशा पदार्थांमुळे फोड अधिक दुखू शकतात. त्याऐवजी मऊ, साधे आणि थंडसर पदार्थ खाण्यावर भर द्यावा.

तोंड वारंवार येत असेल, फोड दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकत असतील तर डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. काही वेळा व्हिटामिन बी१२, फॉलिक ॲसिड किंवा लोहाच्या कमतरतेमुळेही ही समस्या उद्भवू शकते. साध्या घरगुती उपायांमुळे बहुतांश वेळा तोंड आलेले फोड काही दिवसांत बरे होतात, मात्र योग्य आहार, पुरेसे पाणी आणि चांगली झोप यामुळे ही समस्या वारंवार होण्यापासूनही बचाव करता येतो.

# दुर्गराज रायगडाच्या विकासाला वेग

## शिवराज्याभिषेकापूर्वी सुविधा उन्नतीसाठी प्रशासन सज्ज

**माणगाव : बातमीदार**

छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेल्या दुर्गराज रायगडाच्या संवर्धन, विकास आणि पर्यटक सुविधांच्या उन्नतीसाठी राज्य शासनाने विकासकामांना गती देण्याचा निर्धार केला आहे. रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटन आराखडा प्राधिकरणाच्या बैठकीत विविध प्रलंबित कामांचा आढावा घेत संबंधित विभागांना समन्वयाने कामे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.



सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मंत्री भरतशेठ गोगावले यांनी रायगड विकासाच्या विविध विषयांवर मार्गदर्शन केले. किल्ल्यावरील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, कचरा व्यवस्थापन, दिशादर्शक फलक, पर्यटक सुविधा तसेच आपत्ती व्यवस्थापन आराखडा याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

रायगड हा महाराष्ट्राच्या अस्मितेचे आणि स्वराज्याच्या वैभवाचे प्रतीक असल्याने किल्ल्याचे ऐतिहासिक स्वरूप जपत आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर बैठकीत भर देण्यात आला. शिवभक्त आणि पर्यटकांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी विविध यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय निर्माण करून प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.

यावर्षी ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी या तिथीनुसार छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक सोहळा २७ जून रोजी रायगडावर साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर स्वच्छता, पाणीपुरवठा, सुरक्षा व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधांची तयारी वेळेत पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला.

बैठकीत सर्व संबंधित विभाग, तज्ज्ञ आणि हितधारकांच्या सहभागातून महिनाभरात प्रलंबित कामांचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानंतर मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक घेऊन पुढील निर्णय घेतले जाणार आहेत.

दुर्गराज रायगडाचे ऐतिहासिक वैभव जपत आधुनिक सुविधा निर्माण करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून, मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या पाठपुराव्यामुळे रायगड विकासाच्या कामांना नव्याने गती मिळणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# कर्जतमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत करून शाळा प्रवेशोत्सव

**कर्जत : प्रतिनिधी**

सोमवारपासून बहुतांशी शाळा सुरू झाल्या. अनेक ठिकाणी नेहमी प्रमाणे शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली मात्र कर्जत शहरातील महिला मंडळ संचलित विद्या विकास मंदिर शाळेमध्ये विद्यार्थ्यांना फुले देऊन तसेच फुलांची उधळण करून स्वागत केले.

कर्जत महिला मंडळाचे विद्या विकास मंदिर कर्जत या शाळेत शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी सर्व शिक्षकांनी संपूर्ण शाळा सजविली होती. त्यामध्ये फुलांची कमान, सेल्फी पॉईंट इत्यादी सर्व गोष्टीं करून प्रवेशाची जय्यत तयारी करण्यात आली. सर्वत्र फुलांच्या माळा लावून रांगोळी काढून सुशोभीकरण करण्यात आले. ढोल ताशांच्या गजरात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. महिला मंडळ कार्याध्यक्ष



मीनाताई प्रभावळकर यांच्या विशेष उपस्थितीत शाळेच्या मुख्याध्यापिका स्नेहा गाढे यांनी विद्यार्थ्यांची आरती केली तसेच विद्यार्थ्यांना पुष्प देऊन त्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांना पोषण आहार व गोड पदार्थ देण्यात आला. .मान्यवरांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षिका स्मिता गणवे, मेघा पिंगळे, प्रेमा पितळे, आरती कोकरे, सुप्रिया भासे, माधुरी देशमुख, वृषाली माळी, सुषमा सुपे, शारदा राठोड, अर्चना भुसळ, सारिका देशमुख, सुमीता अहिरराव आदी शिक्षिका व सेविका वर्ग उपस्थित होता.

# 'कृषी विभागासाठी पुरवणी बजेटमध्ये आर्थिक तरतूद वाढविल्यास तालुक्यातील शेतकऱ्यांना अधिकाधिक लाभ'

**पोलादपूर : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने राज्याच्या दुग्धोत्पादन वृद्धीसाठी बजेटमधील तरतूद वाढवली आहे. कृषीप्रधान भारतात कृषी उत्पादन वाढीचे प्रयत्न मोठ्या प्रमाणात सुरू असून रायगड जिल्हा परिषदेने कारभारात लोकाभिमुखता आणण्यासाठी प्रत्येक विभागाचे मेळावे आयोजित करून जनतेपर्यंत विविध योजना पोहोचविण्यासाठी प्रयत्न चालविले आहेत. रायगड जिल्हा परिषदेच्या येत्या पुरवणी बजेटमध्ये कृषी विभागासाठी आर्थिक तरतूद वाढविल्यास तरतूद वाढविल्यास पोलादपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना अधिकाधिक लाभ दिला जाईल, अशी ग्वाही रायगड



जिल्हा परिषदेचे कृषी, पशू संवर्धन व दुग्ध शाळा समितीचे सभापती वैकुंठ पाटील यांनी पोलादपूर तालुकास्तरीय कृषी मेळाव्याप्रसंगी दिली.

यावेळी रायगड जिल्हा परिषदेचे अर्थ, शिक्षण व क्रीडा सभापती चंद्रकांत कळंबे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मेळाव्यात पं.स.सभापती अविनाश शिंदे, उपसभापती अनिता भिलारे, राजिप सदस्य डॉ. निलेश कुंभार, गटविकास अधिकारी उदयसिंह साळुंखे, सहायक गटविकास अधिकारी विजय काणेकर, तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे, पं.स.कृषीविस्तार अधिकारी अरुण धिवरे, कृउबा समिती संचालक लक्ष्मण मोरे, भाजपच्या प्रदेश सदस्या डॉ. कुद्रीमोती, माजी जिल्हा उपाध्यक्ष मनोज भागवत, जिल्हा महिला उपाध्यक्षा तनुजा भागवत, तालुका अध्यक्ष वैभव चांदे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे पं.स.सदस्य अनिल दळवी व साक्षी कांबळेकर, उद्यान पंडित रामचंद्र कदमशेठ तसेच अन्य मान्यवर आणि प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.

दरम्यान, यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी, पशू संवर्धन, दुग्ध शाळा विभागामार्फत विविध गट व वैयक्तिक लाभाच्या योजनांची माहिती देर्ण्याया पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी पाणी फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी उपस्थित शेतकऱ्यांना शेतीच्या पाण्याचे नियोजन करण्याबद्दल माहिती दिली आहे.

# महाड चवदार तळे सत्याग्रहाला १०० वर्षे पूर्ण



**मुरुड** : महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाला या वर्षी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. या शताब्दी वर्षानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या वतीने विशेष उपक्रम राबवण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत अलिबाग व मुरूड मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा एक भव्य स्टॅच्यू (पुतळा) सप्रेम भेट देण्यात आला.


### जाहीर नोटीस

सुप्रिम होल्डींग्स अँड हॉस्पिटॅलीटी इंडिया ली. यांना दि. ०९जून २०२६ रोजी सिडको (नैना) या कार्यालयातून बांधकाम परवानगी मिळाली आहे. सिडको (नैना) च्या निर्देशानुसार जाहीर सुचना देण्यासाठी सामान्य अटींच्या (तरतदीचे पालन करण्यास जाहिर नोटीस देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| जमीन मालकाचे नाव आणि पत्ता | सुप्रिम होल्डींग्स अँड हॉस्पिटॅलीटी इंडिया ली. ऑफिस नं.५१० ते ५१३, ५वा मजला, प्लॅटिनिअम स्केअर, श्री सतपाल मल्होत्रा मार्ग, नगर रोड पुणे, ४११०१४. |
| वास्तू विशारदाचे नाव आणि पत्ता | मे. स्पेस एज कंसलटंट (देवयानी खाडिलकर), बी–१०६, नटराज बिल्डींग, शिवसृष्टी कॉम्पलेक्स, मुलुंड गोरेगाव लिंक रोड, मुलुंड (प), मुंबई–४०००८०. |
| स्ट्रक्चरल इंजिनीअरचे नाव व पत्ता | अरूण भकरी, स्ट्रक्चरल इंजिनिअर. अर्किटेक्चर कॉर्नलर, पहिला मजला, प्लॉट नं.६–१०, एन–एस रोड जुहू, विले पार्ले वेस्ट मुं. ४०००४९. |
| कंत्राटदाराचे नाव आणि पत्ता | युनिक एंटरप्रायजेस, ५८६/ए, गुलटेकडी, अल–अमीन सोसायटी, व्हाइट हाउस बिल्डींग, पुणे–४११०३७. |
| साईट ऑफिस चा पत्ता | फायनल प्लॉट नं. २८३, टी.पी.एस.–२, गाव – चिपळे , ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६ |
| बांधकाम परवानगी आदेश कं. | CIDCO/NAINA/Panvel/Chipale /BP–00691/ ACC/2026/544 dated 09.06.2026 |
| एफ एस आय परवानगी | २.५ |
| निवासी सदनिकांची संख्या | निवासी सदनिका – १२४, दुकाने – १३ एकूण – १३७ |
| मंजुर इमरत आराखडा उपलब्ध :– | फायनल प्लॉट नं. २८३, टी.पी.एस.–२, गाव – चिपळे , ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६ |

सही/–
**सुप्रिम होल्डींग्स अँड हॉस्पिटॅलीटी इंडिया ली.**


# खवय्यांचा हिरमोड; पाऊस लांबल्याने गोड्या पाण्यातील मासे गायब

**पाली : प्रतिनिधी**

समुद्रातील मासेमारी जून महिना अर्धा संपत आला, तरी अद्याप पावसाने दमदार हजेरी लावलेली नाही. परिणामी नदी, नाले, तलाव आणि धरणे आटली असून, दुसरीकडे १ जूनपासून समुद्रातील मासेमारीही कायदेशीररीत्या बंद झाली आहे. खाऱ्या आणि गोड्या अशा दोन्ही प्रकारच्या माशांची तीव्र टंचाई निर्माण झाल्यामुळे बाजारात मासळीचे दर कडाडले असून, खवय्यांचा पुरता हिरमोड झाला आहे.

दरवर्षी पावसाळा सुरू झाला की, १ जूनपासून समुद्रातील मासेमारी बंद होते. अशा वेळी खवय्यांच्या उड्या गोड्या पाण्यातील मासळीवर पडतात. पावसाळा सुरू झाल्यावरती ठीक ठिकाणी वलगन लागते. वलगन म्हणजे नदी, तलाव, खाडी येथील मासे अंडी देण्यासाठी शेतात व ओहळात येतात आणि त्यांना पकडले जाते. मात्र, यंदा १५ जून उजाडला तरी पाऊस न पडल्याने जलस्रोत आटले आहेत. त्यामुळे दरवर्षी या दिवसांत मुबलक मिळणारे मळे, शिवडा, कटला, अरलय, वाम, कोलंबी, खवल यांसारखे गोड्या पाण्यातील मासे बाजारातून गायब झाले आहेत.

प्रामुख्याने आदिवासी व गळभोई समाजातील लोक खूप मेहनतीने हे मासे पकडतात. या मोसमात मिळणाऱ्या बहुतांश माशांच्या पोटात अंडी (स्थानिक भाषेत पेर किंवा गाबोळी) असतात. ही गाबोळी खाण्यासाठी खवय्ये आतुर असतात, मात्र यंदा नदी–नाल्यांना पाणीच नसल्याने मासे पकडणे कठीण झाले आहे. यामुळे मासेमारीवर अवलंबून असणाऱ्या स्थानिक बांधवांच्या रोजगारावरही परिणाम झाला आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात जाळे, पाग घेऊन मासेमार नदी–नाल्यांवर मासे पकडण्यासाठी जातात. या दिवसांत माशांना खूप मागणी असते आणि गाबोळी असलेले चविष्ट मासे मिळतात. पण यंदा पाऊसच नसल्याने पाणी आटले आहे आणि मासे मिळेनासे झाले आहेत . 'उधवण' किंवा 'वलगणी'ची प्रतीक्षा कायम

भरपूर पाऊस पडल्यानंतर पाणी वाढले की, खाडीतील आणि नदीतील मासे शेतातील कमी पाण्यात अंडी देण्यासाठी येतात. याला स्थानिक भाषेत 'उधवण' किंवा 'वलगणीचे मासे' म्हणतात. हे मासे पकडण्यासाठी ग्रामीण भागात मोठी झुंबड उडते. ही मजा काही औरच असते, मात्र पाऊस लांबल्यामुळे अद्याप कुठेही पाणी साठलेले नाही. त्यामुळे यंदा वलगणीचे मासे पकडण्याची लगबग अजून सुरू झालेली नाही, असे अलिबाग येथील ॲड. राकेश पाटील यांनी सांगितले.

**टंचाईमुळे किमती गगनाला भिडल्या**

बाजारात आवक घटल्यामुळे उपलब्ध असलेल्या थोड्याफार गोड्या पाण्यातील माशांचे दर मागील वर्षाच्या तुलनेत प्रचंड वाढले आहेत. याशिवाय समुद्रातील मासे मिळत नसल्याने जे काही मासे मिळतात त्यांचेही भाव २५ टक्क्यांनी वाढले आहेत.




### ई–निविदा सूचना

महावितरण

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा–या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी–२०, टी–२१, टी–२२, टी–२३, टी–२४, टी – २५, टी–२६, टी – २७, टी–२८ आणि टी – २९ (२०२६–२७) अशा एकुण **दहा** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. १८.०६.२०२६ पासून ते दि. २४.०६.२०२६ @ १३.००** वाजेपर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. २४.०६.२०२६ ला १५.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत / तारखा / इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल. **(सही)**

**कार्यकारी अभियंता (स्था.) स्थापत्य विभाग भांडुप**



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

### Bhagubai Changu Thakur College of Law, New Panvel

**Plot No. 4, Sector-11, Khanda Colony, New Panvel (West), Tal. – Panvel, Dist. – Raigad – 410206.**

Accredited 'B+' Grade by NAAC (1st Cycle CGPA 2.69)

**Applications are invited for the following posts from the Academic Year 2026-27 (Un-aided)**

| Sr. No | Cadre | Subject | Total No. of Posts | Post Reserved for |
|---|---|---|---|---|
| 1 | Principal | - | 01 | 01 Open |
| 2 | Assistant Professor | Law | 10 | 02 SC, 01 ST, 01 DT(A), 01 NT(B), 01 OBC, 01 SEBC, 01 EWS, 02 Open |

**For Assistant Professor (Horizontal Reservation)**

Women – 03 Posts and Sportsmen – 01 Post

The posts for the reserved category candidates will be filled in by the same category candidates (Domicile of State of Maharashtra) belonging to that particular category only.

Reservation for women will be as per University Circular No. **BCC/16/74/1998 dated 10th March, 1998. 4% reservation shall be for the persons with disability as per University Circular No. Special Cell/ICC/2019-20/05 dated 05th July 2019.**

Candidates having knowledge of Marathi will be preferred.

**"Qualifications, Pay Scales and other requirements shall be as prescribed by UGC Notification dated 18th July 2018, Government of Maharashtra Resolution No. Misc-2018/C.R.56/18/UNI-1, dated 8th March 2019 and University circular No. TAAS/(CT)/ICD/2018-19/1241, dated 26th March, 2019 and revised from time to time' The Government Resolutions & Circular are available on the website mu.ac.in**

Applicants who are already employed must send their application through proper channel. Applicants are required to account for breaks, if any in their academic career.

Applications with full details should reach the **CHAIRMAN, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's, C/o Bhagubai Changu Thakur College of Law, New Panvel, Plot No. 4, Sector-11, Khanda Colony, New Panvel (West), Tal. Panvel, Dist. Raigad – 410206.** Candidates may submit the applications by email to **bcthakurcollegeoflaw@gmail.com** within 15 days from the date of publication of this advertisement.

If required, contact - **Mrs. Pallavi Khot - 9820483404**
**Mr. Ujwal Patil - 9004401961**

This is University approved advertisement

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**CHAIRMAN**
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha Panvel



### पीएम श्री केन्द्रीय विद्यालय एन.ए.डी. करंजा

(शिक्षा मंत्रालय भारत सरकार के अधीन स्वायत्त निकाय)
पता –नौसेना आयुध भंडार, करंजा उरण रायगढ़ महाराष्ट्र–४००७०४
**PM SHRI KENDRIYA VIDYALAYA N.A.D. KARANJA**
An Autonomous Body under Ministry of Education, Govt. of India
Address : Naval Armament Depot, Karanja, Uran, Raigad Maharashtra-400704

| | | |
|---|---|---|
| दूरभाष/फॅक्स–022-27222132, | ई–मेल/E-Mail : kvkaranja@gmail.com | KV CODE : 1205 |
| CBSE Affiliation.1100017 | Web Site: https://nadkaranja.kvs.ac.in | UDISE : 27241501112 |

वेबसाइट – https://nadkaranja.kvs.ac.in ईमेल: kvkaranja@gmail.com

**साक्षात्कार सूचना / Walk-In Interview**
**Urgent Requirement**

पीएम श्री केंद्रीय विद्यालय एन.ए.डी करंजा में शैक्षिक वर्ष २०२६–२७ हेतु पूर्ण रूप से संविदा के आधार पर (on Purely Contractual Basis) शैक्षिक एवं अन्य पदों के लिए साक्षात्कार आयोजित किया जा रहा है –

| पद का नाम | न्यूनतम योग्यता | साक्षात्कार दिवस |
|---|---|---|
| **स्नातकोत्तर शिक्षक (Post Graduate Teachers)** (भौतिक विज्ञान (Physics), अर्थशास्त्र (Economics)) | किसी मान्यता प्राप्त विश्वविद्यालय से संबन्धित विषय में ५०% अंकों के साथ स्नातकोत्तर डिग्री (एम.ए/एम.एस.सी/एम.कॉम) एवं बी.एड डिग्री | **24.06.2026 (बुधवार)** |
| **प्रशिक्षक** नृत्य प्रशिक्षक, खेल प्रशिक्षक, विशेष शिक्षक Dance Teacher, Sports Coach, Special Educator | सम्बंधित विषय में डिग्री / डिप्लोमा | |

**पंजीकरण समय: 8:00 AM TO 10:00 AM**

नोटः अधिक जानकारी हेतु विद्यालय की वेबसाइट देखें। आवेदन प्रपत्र / बायोडाटा फॉर्म विद्यालय की वेबसाइट http://nadkaranja.kvs.ac.in से डाउनलोड कर सकते हैं। साक्षात्कार में भाग लेने वाले अभ्यर्थी को किसी तरह का यात्रा भत्ता नहीं दिया जाएगा। साक्षात्कार के दौरान अपने साथ आधार कार्ड (Original), तीन पासपोर्ट आकार की फोटो, मूल दस्तावेज़ एवं सभी दस्तावेजों की एक एक प्रतिलिपि अवश्य लायें।

Application form QR Code

सही/–
प्राचार्य
पीएम श्री केवि एन. एडी करंजा
नोएक भा केन्द्रीय विद्यालय /PM SHRI Kendriya Vidyalay
एन.ए. डी. करंजा/N.A.D. Karanja चरण जिला–रायगढ़
(महाराष्ट्र) / Uran Dist-Raigad (MH

# अश्विन मुद्गल यांनी सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकपदाचा स्वीकारला कार्यभार

## नव्या एमडींसमोर पाणीपुरवठ्यासह विविध प्रकल्पांना गती देण्याचे आव्हान

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक म्हणून अश्विन मुद्गल यांनी बुधवारी पदभार स्वीकारला असून, नैना प्रकल्पासह, एज्युसीटी व मेडीसीटी या प्रकल्पांसह, सिडको वसाहतींचा पाणीपुरवठा आणि गृहनिर्माणाशी संबंधित महत्त्वाच्या प्रकल्पांना गती देतानाच अतिक्रमण, उद्योग समुहांना जमीन वाटप आणि कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्याची मोठी जबाबदारी त्यांच्यासमोर असणार आहे.



राज्य शासनाने मंगळवारी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांची धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या विशेष कार्यअधिकारीपदी नियुक्ती केल्यानंतर त्यांच्या जागी २००७ च्या तुकडीतील आयएएस अधिकारी अश्विन मुद्गल यांची सिडकोच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली. मुद्गल हे ३० वे सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक ठरले. बेलापूर येथील सिडको भवनात त्यांनी बुधवारी पदभार स्वीकारला. यापूर्वी ते मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात अतिरिक्त महानगर आयुक्त म्हणून कार्यरत होते.

नाशिकचे सहाय्यक जिल्हाधिकारी, पंढरपूर-सोलापूरचे उपजिल्हाधिकारी, सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा व यवतमाळचे जिल्हाधिकारी तसेच नागपूर महापालिकेचे आयुक्त आदी पदांवर त्यांनी काम केले आहे.विजय सिंघल यांच्या २८ महिन्यांच्या कार्यकाळात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला गती दिल्याने या विमानतळाचे संचलन २०२५ अखेर शक्य झाले.

एज्युसिटी आणि मेडीसिटी प्रकल्पांच्या आराखड्यापासून परदेशी संस्थांबरोबरच्या करारांपर्यंत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सिंघल यांच्या कार्यकाळात प्रकल्पग्रस्तांना देय असलेल्या १२.५ टक्के भूखंड वाटपाचे काम ९८ टयांहून अधिक पूर्ण करण्यात आले. नैना प्रकल्पाच्या कामासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करून कंत्राटदार नियुक्तीची प्रक्रिया अंतिम करण्यात आली. सिडकोच्या जमिनीवरील अतिक्रमण हटवून मोठ्या प्रमाणावर जमीन पुन्हा ताब्यात घेण्यात प्रशासनाला यश आले.

राज्यातील सर्वात श्रीमंत महामंडळ म्हणजे १६,२५० कोटी रूपयांची वार्षिक आर्थिक उलाढाल असणाऱ्या सिडको मंडळाचे नेतृत्व मुद्गल यांच्या खांद्यावर आल्यामुळे त्यांच्यासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. मोठ्या व लहान भूखंडांवरील अतिक्रमण रोखणे, मोठ्या म्हणजे ऐरोली सारख्या जादा क्षेत्रफळाच्या जमीन पार्सलच्या व्यवहारामध्ये स्वारस्य निविदा प्रक्रिया पारदर्शक राबवून त्यामधून मोठा महसूल वाढविणे, सिडकोची तिजोरी भरताना अत्यल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठीच्या पंतप्रधान आवास योजनेतील घरांच्या किमती कमी करणे, कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडविणे, नवीन धरणे व भूमिगत जलबोगदा प्रकल्प वेळेत पूर्ण करणे, नवी मुंबई महापालिकेकडून अतिरिक्त पाणी मिळविण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणे तसेच गरजेपोटी उभारलेल्या बांधकामांच्या नियमितीकरणासंदर्भातील प्रकरणात शासनाकडून धोरणात्मक निर्णय मिळविणे, नैना प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरू करणे, शाश्वत विकासाची संकल्पना मांडताना नवी मुंबईतील निसर्गनिर्मित तळ्यांचे व खारफूटी, कांदळवणांचे संरक्षण करून विकास करणे ही प्रमुख आव्हाने त्यांच्या कार्यकाळात महत्त्वाची ठरणार आहेत.

> **सिडको हे देशातील अग्रगण्य नियोजन व विकास महामंडळांपैकी एक असून, सिडकोतर्फे राबविण्यात येणाऱ्या वैविध्यपूर्ण महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे महाराष्ट्रासह देशाच्या विकासाला मोठा हातभार लागत आहे. सध्या सिडकोमार्फत साकारण्यात येत असलेले सर्व महत्त्वपूर्ण प्रकल्प नियोजित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करणे हे माझे सर्वोच्च प्राधान्य राहील.**
>
> **-अश्विन मुद्गल,** उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको मंडळ

# गव्हाण विद्यालयास माजी विद्यार्थी संजय पाटील यांच्यातर्फे अडीच लाखांचा धनादेश

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचे माजी विद्यार्थी व महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीतील कार्यकारी अभियंता एस.एस.सी. बोर्ड परीक्षा १९८८ बॅच चे माजी विद्यार्थी संजय गना पाटील यांच्याकडून विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी प्राचार्य ज्योत्स्ना ठाकूर यांच्या प्रोत्साहनपर मार्गदर्शनातून अडीच लाख रुपयांचा धनादेश त्यांचे सासरे व रयतच्या करंजा शाखेचे माजी मुख्याध्यापक ग. ह.ठाकूर यांचे यांचे शुभहस्ते विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक तथा रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.



यावेळी विद्यालयाचे वरिष्ठ लेखनिक निलेश गोडे, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे, विद्यालयाचे शालेय पोषण आहार विभागाप्रमुख विशांत ठाकूर, माजी लेखनिक चंद्रकांत मढवी, उपशिक्षिका संपदा म्हात्रे आदी उपस्थित होते. माजी मुख्याध्यापक ग.ह.ठाकूर साहेब व उद्योजक माजी विद्यार्थी संजय पाटील यांचे विद्यालयात ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी स्वागत केले.

श्री संजय पाटील यांच्या दातृत्व इच्छेप्रमाणे विद्यालयातून शिष्यवृत्ती परीक्षमध्ये प्राविण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख रकमेची पारितोषिके देण्यासाठी संस्थेकडे अडीच लाख रुपयाचा धनादेश कायम ठेव म्हणून ठेवण्यासाठी सुपूर्द केला असून त्यातून मिळणाऱ्या व्याजावर गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात येणार आहेत.

स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना संजय पाटील यांचे कडून प्राप्त होत असलेल्या पारितोषिकामुळे नक्कीच प्रोत्साहन मिळेल.या बक्षीस रकमेमुळे जास्तीत जास्त विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होतील, विद्यालयाचा माजी विद्यार्थी म्हणून त्यांचे हे अमुल्य योगदान सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी केले.

## दुकानासमोर साहित्य ठेवण्यावरून शिवीगाळ

**नवीन पनवेल :** दुकानासमोर साहित्य ठेवण्यावरून वाद होऊन शिवीगाळ केल्याप्रकरणी अलीसागर ओरा याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. यातील दिलीप तिवारी आणि अलिसागर ओरा हे एकमेकांच्या ओळखीचे आहेत. त्यांचे पनवेल भाजी मार्केट येथे शेजारी-शेजारी दुकान असून दुकानासमोर साहित्य ठेवण्यावरून त्यांच्यामध्ये वाद झाला आणि विरोधक अलिसागर याने त्यांना शिवीगाळ केली.

# असंसर्गजन्य आजारांविरोधात नवी मुंबई महानगरपालिकेची प्रभावी मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

आजच्या धावपळीच्या आणि बदलत्या जीवनशैलीमुळे मधुमेह , उच्च रक्तदाब, हृदयविकार तसेच विविध प्रकारचे कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग तपासणी व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेची रुग्णालये व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ३० वर्षांवरील स्त्री-पुरुषांची नियमित तपासणी करण्यात येत असून, संबंधित माहिती शासनाच्या 'एनएसडी डिजिटल पोर्टल'वर नोंदविण्यात येत आहे.या कार्यक्रमांतर्गत उच्च रक्तदाब, मधुमेह, मुख कर्करोग, स्तन कर्करोग आणि गर्भाशय मुख कर्करोग यांची तपासणी व चाचण्या करण्यात येत आहे. तसेच संशयित रुग्णांना पुढील उपचारांसाठी सार्वजनिक रुग्णालय, नेरुळ येथील ऑन्कोलॉजी विभागात संदर्भित करण्यात येते.

याविषयी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचेमार्फत सातत्याने आढावा घेतला जात असून त्यांच्या निर्देशानुसार राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग तपासणी व नियंत्रण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध प्रकारची कार्यवाही करण्यात येत आहे.

यामध्ये ३० वर्षांवरील नागरिकांची घरभेटीद्वारे तसेच आरोग्य केंद्रांवर नोंदणी करण्यात येत आहे.या तपासणी दरम्यान एखाद्या व्यक्तीस उच्च रक्तदाब किंवा त्याच्या रक्तातील साखरेचे प्रमाण अधिक आढळल्यास तात्काळ उपचार सुरू करण्यात येतात.महिलांमध्ये गर्भाशय मुखाचा व स्तनाचा कर्करोग तसेच पुरुषांमध्ये मुख कर्करोगाची प्राथमिक तपासणी केली जाते. 'एनसीडी पोर्टल'वर नोंदणी झालेल्या सर्व रुग्णांना मोफत औषधोपचार व नियमित पाठपुरावा सुविधा उपलब्ध करून दिली जाते. तसेच डिजिटल हेल्थ आयडी लिंक करण्यात येतो.



आशा स्वयंसेविकांची महत्त्वपूर्ण भूमिका

आशा स्वयंसेविका आपल्या कार्यक्षेत्रातील कुटुंबांशी थेट संपर्क साधून विविध महत्त्वाची कामे करीत आहेत. यामध्ये त्यांच्यामार्फत - ३० वर्षांवरील प्रत्येक नागरिकासाठी 'कम्युनिटी बेस्ड असेसमेंट चेकलिस्ट' फॉर्म भरला जातो. उपचार सुरू असलेल्या रुग्णांनी वेळेवर औषधे घेतली की नाही यासाठी नियमित गृहभेटी दिल्या जातात. संशयित नागरिकांची एएनएम मार्फत डिजिटल बीपी मशीन व ग्लुकोमीटरच्या सहाय्याने रक्तदाब आणि रक्तातील साखरेची मोफत तपासणी केली जाते. ३० वर्षांवरील महिलांमध्ये गर्भाशय मुख व स्तन कर्करोगाचे प्राथमिक परीक्षण केले जाते.तपासणी केलेल्या प्रत्येक नागरिकाची माहिती शासनाच्या अधिकृत NCD डिजिटल पोर्टलवर नोंदवली जाते.

या प्रक्रियेत २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतील वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत -आशा स्वयंसेविका व एएनएम यांनी स्क्रीनिंग करून पाठवलेल्या संशयित रुग्णांची वैद्यकीय तपासणी करून अंतिम निदान केले जाते.

राष्ट्रीय उपचार पद्धतीनुसार आवश्यक औषधे व डोस निश्चित करून उपचार सुरू करण्यात येतो.. तोंड, स्तन व गर्भाशय मुख कर्करोगाच्या संशयित रुग्णांची तपासणी केली जाते. पुढील तपासणी अथवा तज्ज्ञ डॉक्टरांची आवश्यकता असल्यास रुग्णांना सार्वजनिक रुग्णालय, नेरुळ येथे संदर्भित करण्यात येते.

जुनाट आजार असलेल्या रुग्णांची दरमहा तपासणी करून त्यांच्या प्रकृतीचा व औषधांच्या परिणामांचा आढावा घेतला जातो.तरी नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व ३० वर्षांवरील नागरिकांनी या असंसर्गजन्य रोग तपासणी कार्यक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. मधुमेह, उच्च रक्तदाब तसेच विविध प्रकारच्या कर्करोगाच्या निदानासाठी आपल्या जवळच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन तपासणी करून घ्यावी असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी करतांना तेथे आवश्यक मार्गदर्शन करण्यात येत असल्याची माहिती दिली आहे.

## 'स्वतः आधी, नंतर जग' पुस्तकाचे प्रकाशन

**नवी मुंबई : बातमीदार**

आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून नवी मुंबईतील सानपाडा येथे आयोजित एका विशेष कार्यक्रमात, एक गृहिणी ते ' यशस्वी संस्थापिका', 'योग मार्गदर्शक' आणि 'लेखिका' असा अत्यंत प्रेरणादायी प्रवास गाठणाऱ्या काजल नाईक यांनी आपल्या 'योग रहस्य' या वेलनेस स्टार्टअपचा अधिकृत शुभारंभ केला . याच कार्यक्रमात त्यांच्या हृदयाच्या गाभाऱ्यातून शब्दाबद्ध झालेल्या 'स्वतः आधी, नंतर जग' या पहिल्याच पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले. दीपप्रज्वलन करून या नव्या प्रवासाची सुरुवात करण्यात आली.

आपल्या 'स्वतः आधी, नंतर जग' या पुस्तकाच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकताना काजल नाईक यांनी आयुष्यातील विविध अनुभव उपस्थितांसमोर मांडले. घर-कुटुंबाच्या जबाबदाऱ्या सांभाळताना महिलांची स्वतःची ओळख कुठेतरी हरवून जाते, हे कटू सत्य त्यांनी अधोरेखित केले. म्हणूनच, या पुस्तकात त्यांनी केवळ स्वतःचेच अनुभव न मांडता, सभोवतालच्या अनेक महिलांचे संघर्ष, त्यांच्या भावना आणि जीवनप्रवास अत्यंत संवेदनशीलतेने शब्दांत गुंफला आहे.



# शिव प्रतिष्ठान करंजाडे यांच्या वतीने अनाथाश्रमामध्ये शालेय कीटचे वाटप

**उरण : बातमीदार**

शिव प्रतिष्ठान करंजाडे या सामाजिक संस्थेने शिवराज्याभिषेक सोहळ्याचे ओचित्य साधून अनाथ निराधार मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून एक समाजापूढे आदर्श निर्माण केला आहे.

या कार्यक्रमाला शिवप्रतिष्ठान अध्यक्ष सत्यजित पाटील, सुनील अंबावडे,प्रशांत श्वट्टी,अमर कुसले, शिव प्रतिष्ठान सचिव राकेश कुसले, योगेश कुलाल, अथर्व आदी मान्यवर उपस्थित होते. गिरीजा फॉउंडेशनच्या संस्थापिका सुनिता मॅडमनी बोलताना सांगितलं की शिव प्रतिष्ठान गेल्या दोन वर्षापासून सर्व अनाथ निराधार मुलांना शैक्षणिक साहित्य असुद्या किंवा राशन असुद्या नेहमीच ते आमच्या गरजा पूर्ण करत असतात म्हणून शिव प्रतिष्ठान ची समाजाप्रती काम करण्याची जी जिद्द आहे अश्या जिद्दीला आमचा सलाम आहे.येणाऱ्या



कालावधील मी महाराष्ट्र शासनाला विनंती करते की शिव प्रतिष्ठान करंजाडे ला एक सामाजिक पुरस्कार देण्यात यावा.त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा.

शिवप्रतिष्ठान करंजाडे या सामाजिक संस्थेतर्फे वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. सदर राबविलेल्या उपक्रमामुळे अनाथ निराधार मुलांना अत्यंत गरजेचे असलेले शैक्षणिक साहित्य किट प्राप्त झाल्याने त्यांनी आनंद व समाधान व्यक्त करत शिवप्रतिष्ठान करंजाडेचे आभार मानले आहेत. सदर उपक्रमाचे सर्वच क्षेत्रातून कौतुक होत असून असे उपक्रम सर्वत्र राबविले पाहिजे अशा भावना जनतेतून व्यक्त होत आहे.

# स्मार्ट मीटरच्या संदेशांमुळे संभ्रम ; महावितरणचा खुलासा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महावितरणकडून पाठविण्यात आलेल्या '४८ तासांत स्मार्ट मीटर बसविण्यात येईल' या संदेशामुळे गेल्या काही दिवसांपासून शहरातील लाखो वीज ग्राहकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित राहणे, स्मार्ट मीटरमुळे वाढीव बिले येण्याच्या चर्चांना आलेले उधाण आणि प्रकल्पात अदानी समूहाच्या सहभागाबाबत विविध अफवा पसरत असताना महावितरणने याबाबत सविस्तर खुलासा केला आहे.



नवी मुंबईत सुमारे १२ लाख वीज ग्राहक असून त्यापैकी साडेतीन लाख ग्राहकांकडे आतापर्यंत स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. उर्वरित ग्राहकांकडेही टप्प्याटप्प्याने स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरू राहणार असल्याची माहिती महावितरणचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील यांनी दिली.

गेल्या काही दिवसांत अनेक ग्राहकांना स्मार्ट मीटर बसविण्यापूर्वी पूर्वसूचना म्हणून मोबाइलवर संदेश पाठविण्यात आले आहेत. या संदेशानंतर समाज माध्यमांवर विविध प्रकारच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. काही ठिकाणी स्मार्ट मीटर बसवल्यानंतर बिले वाढल्याचा दावा करण्यात आला येत आहे, तर काहींनी भविष्यात प्रीपेड पद्धती लागू होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणने स्मार्ट मीटर ही केंद्र सरकारच्या धोरणानुसार राबविली जाणारी योजना असल्याचे स्पष्ट केले आहे.

अधीक्षक अभियंता दीपक पाटील यांच्या मते, स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना त्यांच्या वीज वापराची माहिती जवळपास प्रत्यक्ष वेळेत उपलब्ध होते. मोबाइल ॲपवर दर १५ मिनिटांनी वापराचा तपशील पाहता येतो. दिवसातील कोणत्या वेळेत जास्त वीज वापरली जाते, महिन्याचे अंदाजित बिल किती येऊ शकते, याची माहिती ग्राहकांना आधीच मिळत असल्याने वीज वापराचे नियोजन करणे सोपे होते. पारंपरिक मीटरमध्ये मीटर रीडरवर अवलंबून राहावे लागत असताना स्मार्ट मीटरमुळे स्वयंचलित आणि अचूक बिलिंग होणार असल्याचा दावा त्यांनी केला.

स्मार्ट मीटर प्रकल्पामागे अदानी समूहाचा थेट ताबा असल्याच्या चर्चांनाही महावितरणने फेटाळले आहे. स्मार्ट मीटर, वीज वितरण यंत्रणा, ग्राहकांची माहिती आणि संपूर्ण मालमत्ता ही महावितरणचीच असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. अदानी समूहाची भूमिका केवळ तांत्रिक सुविधा पुरविणे आणि मीटर बदलण्याच्या प्रक्रियेत सहाय्य करणे इतकीच मर्यादित असल्याचे सांगण्यात आले. मीटरदेखील अदानी कंपनीचे नसून अधिकृत उत्पादक कंपन्यांकडून पुरविले जात असल्याचे महावितरणने नमूद केले आहे.

महावितरणने घरगुती ग्राहकांसाठी उपलब्ध असलेल्या 'टाइम ऑफ डे' (ToD) सवलतीचाही उल्लेख केला. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या सौरऊर्जा उपलब्ध असलेल्या कालावधीत वीज वापरल्यास प्रति युनिट ८५ पैशांपर्यंत सवलत मिळू शकते. त्यामुळे वॉशिंग मशीन, गिझर किंवा इतर जास्त वीज वापरणारी उपकरणे दिवसा वापरल्यास ग्राहकांच्या वीजबिलात बचत होऊ शकते, असे महावितरणचे म्हणणे आहे.वाढीव बिलांच्या तक्रारींबाबतही महावितरणने भूमिका स्पष्ट केली आहे. साडेतीन लाखांहून अधिक स्मार्ट मीटर बसविण्यात आले तक्रारी अत्यल्प असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

# श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टच्या अध्यक्षपदी पुनीत बालन

**उरण : वार्ताहर**

कै. सौ. लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टच्या नव्या विश्वस्त मंडळाची निवड जाहीर करण्यात आली असून ट्रस्टच्या अध्यक्षपदी पुनीत बालन यांची निवड करण्यात आली आहे. राजू बलकवडे यांची कार्यकारी विश्वस्त म्हणून नियुक्ती करण्यात आली असून ॲड. विवेक भरगुडे आणि वर्षा थोरवे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली आहे.



तसेच सुरज थोरात यांच्याकडे खजिनदारपदाची जबाबदारी सोपविण्यात आली असून नितीन पंडित यांची उत्सव प्रमुख तर मनीषाताई खेडेकर यांची उपउत्सव प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पराग काळकर आणि महेंद्रशेठ गाढवे यांची विश्वस्त म्हणून निवड झाली आहे.

दरम्यान, ट्रस्टच्या विश्वस्त निवड प्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप काही व्यक्तींनी केला होता. मात्र, या प्रकरणाची चौकशी झाल्यानंतर निवड प्रक्रियेत कोणतीही अनियमितता झालेली नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यानंतर धर्मादाय आयुक्तांच्या आदेशानुसार नव्या विश्वस्त मंडळाची निवड निश्चित करण्यात आली.

नवीन विश्वस्त मंडळाच्या निवडीमुळे मंदिराच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना अधिक बळ मिळणार असल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली आहे.

> **धर्मादाय आयुक्तांनी दिलेल्या निकालाचे मी मनःपूर्वक स्वागत करतो. 'भगवान के दरबार में देर है, अंधेर नहीं' या उक्तीचा प्रत्यय देणारा हा निर्णय असून न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करणारा आहे. दत्तमंदिर ट्रस्टचा अध्यक्ष म्हणून मंदिराची परंपरा, श्रद्धा आणि संस्कृती यांना कोणताही धक्का लागू न देता भाविकांसाठी लोककल्याणकारी उपक्रम राबविण्यावर आमचा भर राहील.**
>
> **- पुनीत बालन, अध्यक्ष**

# भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी घेतली कामगारमंत्री फुंडकर यांची भेट



**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांची नुकतीच मंत्रालयात भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी सदिच्छा भेट घेऊन भेटीदरम्यान युवकांच्या विविध प्रश्नांसंदर्भात सकारात्मक चर्चा केली.

मंत्री आकाश फुंडकर यांच्या भेटीत निलेश थोरे यांनी युवकांना अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे,स्थानिक युवकांना प्राधान्य मिळवून देणे व कौशल्य विकासाला चालना देणे,बांधकाम कामगार योजनांच्या नोंदणी दरम्यान कामगारांना भेडसावणाऱ्या समस्यां मांडणे,योजनांचा लाभ अधिकाधिक युवकांपर्यंत पोहचविण्यासाठी अमंलबजावणीवर भर,युवकांमध्ये उद्योजकतेला चालना देणे व ग्रामीण भागात रोजगारानिर्मितीच्या संधी वाढविणे याबाबत दोघांमध्ये सकारात्मक चर्चा घडून आली.

याबाबत प्रसार माध्यमांजवळ बोलताना निलेश थोरे यांनी सांगितले,युवकांचे आज बरेच प्रश्न आहेत. युवकांचे हे प्रश्न सुटावेत यासाठी आपण मंत्रालयात जाऊन कामगार मंत्री आकाश फुंडकर साहेब यांची भेट घेऊन त्यांच्याशी युवकांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांसंदर्भात चर्चा केली. या भेटीदरम्यान झालेल्या चर्चेत युवकांच्या या प्रश्नांबत मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक ते सहकार्य व प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

## मुंबई–पुणे कॉरिडॉरच्या कनेक्टिंग लिंक वरील व्हॅली ब्रिजवर तीन कारचा अपघात

**खालापूर , चौक, : प्रतिनिधी**

मुंबई पुणे कॉरिडॉरच्या कनेक्टिंग लिंक मार्गावरील व्हॅली ब्रिज या ठिकाणी बुधवारी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या दरम्यान तीन कारचा साखळी अपघात झाला. सुदैवाने या अपघातात कोणालाही दुखापत झाली नसून तिन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे.



प्राप्त माहितीनुसार, फॉर्च्यूनर (MH ०५ CH ३५१२), वेरणा (AP ३९ LW ९९७९) आणि कार क्रमांक MH ०२ DZ ८६४० ही वाहने मुंबईहून पुण्याकडे जात असताना किमी ०३/६०० वरील व्हॅली ब्रिज परिसरात आली असता हा अपघात घडला. यातील फॉर्च्यूनर कार अचानक तिसऱ्या लेनमध्ये थांबल्याने मागून येणाऱ्या वेरणा कारने तिला धडक दिली. त्यानंतर वेरणा कारच्या मागून येणाऱ्या MH ०२ DZ ८६४० या कारने वेरणाला धडक दिल्याने साखळी अपघात झाला.

अपघाताची माहिती मिळताच महामार्ग वाहतूक पोलीस यंत्रणा, बोरघाटचे अधिकारी व कर्मचारी तसेच संबंधित यंत्रणांचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तात्काळ मदतकार्य हाती घेत अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या सहाय्याने रस्त्याच्या बाजूला हलवली.

या घटनेमुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. मात्र यंत्रणांच्या तत्पर कार्यवाहीमुळे वाहतूक लवकरच सुरळीत करण्यात आली. अपघातात कोणतीही जीवितहानी अथवा दुखापत झाली नसल्याने मोठी दुर्घटना टळली आहे.

## वाघ्रणवाडीत हातभट्टी अड्डे नेस्तनाबूत

**नागोठणे : बातमीदार**

अवैध दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरोधात नागोठणे पोलीस ठाण्याने धडक कारवाईचे सत्र सुरू केले असून वाघ्रणवाडी परिसरातील जंगलामध्ये सुरू असलेले गावठी हातभट्टी दारूचे अड्डे उध्वस्त करून त्यांचे समूळ उच्चाटन करण्यात आले आहे.

प्राप्त गुप्त माहितीच्या आधारे वाघ्रणवाडी परिसरात अवैधरित्या दारू निर्मिती करून विक्रीसाठी साठवणूक केली जात असल्याची माहिती नागोठणे पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवतरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रसाद गोकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाने कारवाई केली.

पोलीस पथकाने वाघ्रणवाडी जंगल परिसरात तब्बल २५ किलोमीटर आत जाऊन शोधमोहीम राबविली. यावेळी गावठी हातभट्टी दारू तयार



करण्यासाठी उभारलेले अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले. या कारवाईत पोलीस हवालदार अथर्व पाटील, मनोज भोईर, पोलीस शिपाई गणेश चोरगे यांच्यासह पथकातील कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. सदर प्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कारवाईदरम्यान एकूण ९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पुढील तपास नागोठणे पोलीस करीत आहेत.

## अशोक ल. लोखंडे विद्यालयात विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, कीट, पाठ्यपुस्तकांचे वाटप

**मुरुड : प्रतिनिधी**

पिटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यालयात इयत्ता पाचवी ते दहावी मधील शालेय विद्यार्थ्यांना सेवा सहयोग फाउंडेशन, मुंबई यांच्या वतीने ३०० विद्यार्थ्यांना स्कूल बॅग कीट, वह्या चे वाटप मोठ्या प्रमाणात करण्यात आले.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण घेत असताना मूलभूत सेवा मिळवून दिल्या तर विद्यार्थी निश्चित प्रगती करतील या मूळ उद्देशातून सेवा सहयोग फाउंडेशन , मुंबई च्या वतीने स्कूल बॅग कीट ,वह्या चे वाटप करण्यात आले .यावेळी या



शाळेचे चेअरमन गणपत जगताप व संस्थेचे पदाधिकारी यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना स्कूल बॅग कीट चे वाटप करण्यात आले.स्कूल बॅग किटमध्ये डिक्शनरी ,आलेख वही, कंपास पेटी यांचा समावेश होता .

यावेळी संस्थेचे विश्वस्त महादेव गोळे ,अध्यक्ष गणपत जगताप ,सचिव गोविंद ठाकर ,उपाध्यक्ष मनोहर गायकवाड , सदस्य पंदेरे गुरुजी,खेळु वाजे ,रमेश पिंपळे, सर्वेश तळेकर,उदय शेलार, विद्यालयाचे मुख्याध्यापक अकील मुलाणी सर, माजी मुख्याध्यापक अरुण खुळपे सर, विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग आदी मान्यवर उपस्थित होते.

## पेण प्रायव्हेट हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे पुष्पवृष्टीने स्वागत

**पेण : प्रतिनिधी**

गेल्या वर्षीप्रमाणेच यंदाही राज्याच्या प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे राज्यातील शाळांमध्ये शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी शालेय प्रवेशोत्सवाचे आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार शहरातील शाळांनी विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभांचे आयोजन केले होते. यावेळी पेण प्रायव्हेट हायस्कुलमध्येही मुख्याध्यापक आर.एम.पाटील, पर्यवेक्षक श्री. ढाकणे सर, आदींसह व शिक्षक यांनी मुलांचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांचे यावेळी पुष्पवृष्टी करीत बँडच्या तालावर विद्यार्थ्यांचे स्वागत केले.



# वांगणी हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे जवळील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक विद्यालय वांगणी ( स्थळ– बाळसई ) येथे विद्यार्थ्यांचा शाळेमध्ये २०२६ चा प्रवेशोत्सव सोहळा सोमवार दि.१५ जुन २०२६ रोजी अतिशय उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात प्रथमतः सरस्वती पुजन व दिपप्रज्वलन करुन करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

शाळेमध्ये नविन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत व औक्षण करुन पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्यात आले. तसेच शासनाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी देण्यात आलेले मोफत पाठ्यपुस्तकांचे विध्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे सामाजिक प्रतिष्ठानचे प्रमुख प्रमोद म्हसकर यांच्यातर्फे कानसई गावातील सामाजिक कार्यकर्ते सुधिर ढाणे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्या व छत्र्यांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाला वांगणी हायस्कूलचे स्थानिक समिती अध्यक्ष मधुकर ठमके, रोहा पंचायत समिती माजी सभापती सदानंद गायकर, शाळा समिती सदस्य हरिश्चंद्र तेलंगे, चंद्रकांत गायकवाड, मोरैश्वर तेलंगे, ऐनघर ग्राम पंचायत सदस्य किशोर नावले , सामाजिक कार्यकर्ते सुधिर ढाणे, श्रीमती संपदा ठाकुर, भारती जाधव, वैशाली जाधव, मोनाली रेवाले, अनिता कदम आदी मान्यवरांसह पालकवर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक टिळक खाडे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व शाळेच्या शिक्षिका तेजस्विनी गायकवाड यांनी तर आभार प्रदर्शन शिक्षिका संस्कृती घरट यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या शिक्षकांनी मेहनत घेतली.



## जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढत आहे -जि. प. सदस्या नलीनी लोखंडे

**तळा : प्रतिनिधी**

टोकार्डे केंद्रातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मालाठे येथे शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ चा शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला

प्रथम विद्यार्थ्यांची प्रवेश दिंडी गावातून काढण्यात आली.त्यातून नागरिकांना प्रत्येकाने शिक्षण घेतले पाहिजे हा संदेश दिला त्यानंतर विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. इयत्ता पहिली दाखल विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प व पुष्पवृष्टी करून त्यांचे स्वागत करण्यात आले.

सदर कार्यक्रमास जि प.सदस्या नलीनी लोखंडे ,उपसरपंच नागेश लोखंडे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा किर्ती माने ,नम्रता भगत,दिक्षा भगत,सुरेखा ठमके, मुख्याध्यापक रविंद्र फडके,अजयकुमार गादेकर आदि मान्यवर व पालक महिला ग्रामस्थ उपस्थित होते.



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकातील सभागृहाचा होतोय कायापालट

**महाड : प्रतिनिधी**

ऐतिहासिक महाड मधील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकातील सभागृहाच्या वातानुकूलित यंत्रणेत कायम बिघाड होत होता. आता ही यंत्रणा अद्ययावत करण्याचे काम महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागाच्या बार्टी मार्फत हातात घेण्यात आले आहे. राष्ट्रीय स्मारकातील नाट्यगृह अद्ययावत होऊन महाडकरांसाठी पुन्हा नव्या दमाने लवकरच सुरू होणार आहे.

महाडमध्ये शासनाकडून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक उभे करण्यात आले आहे. या राष्ट्रीय स्मारकामध्ये अनेक उपक्रमांसाठी दालने असली तरी गेली वीस वर्षांमध्ये येथील



नाट्यगृह आणि मोजकीच यंत्रणा सुरू आहे. सुरुवातीच्या काळामध्ये समाज कल्याण विभागामार्फत राष्ट्रीय स्मारकाची देखभाल दुरुस्ती केली जात होती. मात्र एकही उपक्रम सुरू झाला नसल्याने या ठिकाणी कायम आवाज उठवला जात होता.

आजही या राष्ट्रीय स्मारकामध्ये केवळ नाट्यगृह, वाचनालय, अभ्यासिका आणि विपश्यना केंद्र, हेच उपक्रम सुरू आहेत. मध्यंतरीच्या काळामध्ये येथील तरण तलाव महाड नगरपालिकेकडे चालवण्यास देण्यात आले होते. मात्र वर्षभरातच परवडत नसल्याचे कारण देत या संस्थेने हे तरणतलाव चालवण्यास घेतले होते हे काम सोडून दिले. त्यामुळे आज हे तरुण तलाव नादुरुस्त अवस्थेत पडून आहे. महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या ताब्यामध्ये हे राष्ट्रीय स्मारक देण्यात आलेले आहे. सध्या या संस्थेमार्फत सुरू असून देखभाल दुरुस्ती देखील त्यांच्या मार्फत केली जात आहे.

महाड सह संपूर्ण परिसरामध्ये येथील नाट्यगृह प्रचलित आहे. या सभागृहामध्ये विविध शाळांचे सांस्कृतिक कार्यक्रम, राजकीय सभा, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम, विविध सेमिनार घेण्यात येतात. मात्र गेली वीस वर्ष येथील सभागृहाची देखभाल दुरुस्ती वरचेवर केली जात होती. यामुळे येथील वातानुकूलित यंत्रणा सातत्याने बंद पडत होती. यावर आवाज उठवल्यानंतर आता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या वतीने दुरुस्तीचे काम हातात घेण्यात आले आहे. सभागृहातील वातानुकूलित यंत्रणा अद्ययावत होत असून सभागृहातील खुर्च्यांचे कापडी आवरण देखील बदलण्यात येत आहे. स्टेज वरील पडदे आणि भिंती लगत असणारे कर्टन देखील बदलण्यात येणार आहेत. ध्वनी यंत्रणेमध्ये देखील बदल केला जाणार असल्याची माहिती येथील प्रशासनाकडून देण्यात आली आहे. अवघ्या काही दिवसातच महाड मधील हे सभागृह महाडकारांसाठी अद्ययावत स्वरूपामध्ये दिसणार आहे.

या राष्ट्रीय स्मारकाच्या इमारतीची देखभाल दुरुस्ती शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केली जाते. येथील अनेक कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडूनच करण्यात आले आहेत.

# रोहेकर २० जूनपर्यंत पेरणी टाळा; कृषी विभागाचा सल्ला, बळीराजाचे डोळे आभाळाकडे

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात मान्सूनच्या पावसाने अद्याप समाधानकारक हजेरी लावली नसल्याने खरीप हंगामावर संकटाचे ढग दाटले आहेत. जून महिन्याचा दुसरा आठवडा संपत आला तरी अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकरी वर्ग चिंताग्रस्त झाला असून पेरणी केलेल्या क्षेत्रातील पिकांच्या उगवणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तालुक्याचे कृषी अधिकारी महादेव करे यांनी दिलेल्या माहितीनुसार, रोहा तालुक्यात सुमारे ७ हजार १०० हेक्टर क्षेत्र भात लागवडीखाली असून २५० हेक्टर क्षेत्रावर नाचणी तर ५ ते १० हेक्टर क्षेत्रावर वरीची लागवड केली जाते. यापैकी यंदाच्या खरीप हंगामात





आतापर्यंत जवळपास ५० टक्के पेरणी पूर्ण झाली आहे. तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी जया, जोरदार, जोतिका आणि रुपाली या भात बियाण्यांची पेरणी केली आहे.मात्र, पेरणीनंतर समाधानकारक पाऊस न झाल्याने जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असून बियाण्यांच्या उगवणीवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी दुबार पेरणीचे संकट उभे राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

कृषी अधिकारी महादेव करे यांनी सांगितले की, भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार २० जूनपर्यंत कोरड्या हवामानाची स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. त्यानंतरच्या आठवड्यात पावसाचे प्रमाण वाढण्याची चिन्हे दिसत असली तरी यंदा एकूण पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी सावधगिरी बाळगून कृषी विभागाच्या सूचनांचे पालन करावे.

ज्या शेतकऱ्यांनी पेरणी केली आहे त्यांनी शक्य असल्यास पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी तसेच तण नियंत्रण व आंतरमशागत करून जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करावा. तर ज्या शेतकऱ्यांची पेरणी अद्याप झालेली नाही त्यांनी २० जूनपर्यंत पेरणीची घाई करू नये. हवामानाचा पुढील अंदाज लक्षात घेऊनच पेरणी करावी. कोरड्या जमिनीत पेरणी केल्यास बियाणे व खर्च वाया जाऊन मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असल्याचा इशाराही कृषी विभागाने दिला आहे.

याशिवाय ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याचा कायमस्वरूपी स्रोत उपलब्ध आहे, त्यांनी भाताची नर्सरी तयार करण्यास हरकत नसल्याचेही कृषी अधिकारी महादेव करे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे पाऊस नियमित झाल्यानंतर लागवडीचे नियोजन करणे सोपे जाईल, असे त्यांनी सांगितले.

तालुक्यातील वाशी गावातील शेतकरी जयवंत शिगवण यांनी सांगितले की, "मी तीन दिवसांपूर्वी एक एकर क्षेत्रात जोतिका या भात बियाण्याची पेरणी केली आहे. आता आम्ही सर्व शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहोत. जर वेळेत पाऊस पडला नाही तर दुबार पेरणी करावी लागेल. एकदाच पाऊस पडून पुन्हा खंड पडल्यास बियाण्यांची पूर्णपणे नासाडी होऊ शकते. त्यामुळे येणाऱ्या काळात बळीराजासमोर मोठे संकट उभे राहण्याची शक्यता आहे."

पाऊस लांबल्याने शेतकरी हवालदिल झाले असून पेरणी केलेल्या शेतकऱ्यांचे लक्ष आता आकाशाकडे लागले आहे. बँकेचे कर्ज, उसनवारी आणि वाढलेला शेती खर्च यामुळे शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीसाठी तालुका कृषी कार्यालय अथवा ग्राम कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# मेस्सीची विश्वचषकात हॅट्ट्रिक!

## २००व्या सामन्यात घडविला इतिहास



**लखनऊ : वृत्तसंस्था**

स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीने फिफा विश्वचषक २०२६च्या पहिल्याच सामन्यात हॅट्ट्रिक करत संघाला दणदणीत विजय मिळवून दिला. क्वीन्स सिटी येथील अरोहेड स्टेडियमवर अल्जेरियाविरुद्ध झालेल्या या सामन्यात आपल्या कारकिर्दीतील कदाचित अखेरचा विश्वचषक खेळणाऱ्या मेस्सीने पुन्हा एकदा आपल्या सुवर्णकाळाची झलक दाखवली.

लिओनेल मेस्सीने फिफा विश्वचषकाच्या अगदी पहिल्याच सामन्यात इतिहास घडवला. अल्जेरियाविरुद्धच्या सामन्यात त्याने आपल्या कारकिर्दीतील पहिलीच विश्वचषकातील हॅट्ट्रिक नोंदवली. मेस्सीने विश्वचषकात हॅट्ट्रिक झळकावत आपल्या देदीप्यमान कारकिर्दीत आणखी एक मानाचा तुरा खोवला. या हॅट्ट्रिकसह फिफा विश्वचषकात सर्वाधिक गोल (१६) करणाऱ्या जर्मनीच्या मिरोस्लाव क्लोसच्या विक्रमाशीही मेस्सीने बरोबरी केली आहे. विशेष म्हणजे अर्जेंटिनासाठी खेळलेल्या आपल्या २०० व्या सामन्यात त्याने ही कामगिरी करून दाखवली.

अल्जेरियाविरुद्धच्या सामन्यात मेस्सीने १८ व्या मिनिटाला आपली हॅट्ट्रिक साधण्यास सुरुवात केली; त्यावेळी त्याने आपला पहिला गोल केला. सामन्याच्या अवघ्या १८व्या मिनिटाला त्याने फिफा विश्वचषक २०२६ मधील आपला पहिला गोल नोंदवला. बॉक्सच्या बाहेरून मारलेल्या त्याच्या जबरदस्त आणि अचूक फटक्याने गोलरक्षकाला कोणतीही संधी न देता चेंडू थेट जाळ्यात धाडला आणि अर्जेंटिनाला १–० अशी आघाडी मिळवून दिली.

पहिला हाफ मेस्सीच्या एका गोलवर संपला. दुसरा हाफ सुरू होताच अर्जेंटिनाची आघाडी १–० वरून २–० पर्यंत नेण्यास मेस्सीला फारसा वेळ लागला नाही. त्याने ६० व्या मिनिटाला सामन्यातील आपला दुसरा गोल केला.

त्यानंतर त्याने तिसरा गोल इतक्या नेमकेपणाने केला की खरंच जादू झाली काय असा भास होईल. अल्जेरियाच्या बचावफळीला पूर्णपणे भेदून मेस्सीने हा गोल केला आणि आपली हॅट्ट्रिक पूर्ण केली. मेस्सीची फिफा विश्वचषकातील पहिली हॅट्ट्रिक आहे.

शिवाय त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील ही १२वी हॅट्ट्रिक ठरली आहे. या हॅट्ट्रिकसह त्याने फिफा विश्वचषकात सर्वाधिक गोल करणाऱ्या मिरोस्लाव क्लोसच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. आता मेस्सीच्या नावावरही विश्वचषकातील १६ गोल नोंदवले आहेत.

दरम्यान, त्याने आतापर्यंत केवळ २०२६ च्या फिफा विश्वचषकातील आपला पहिला सामना खेळला आहे. त्यामुळे भविष्यात क्लोसचा विक्रम केवळ मोडला जाण्याचीच नाही, तर एक नवीन विक्रम प्रस्थापित होण्याचीही दाट शक्यता दिसत आहे.

# अफगाणिस्तानला १०१ धावांनी हरवून `इंडिया–अ` ची फायनलमध्ये एण्ट्री

**दांबुला : वृत्तसंस्था**



श्रीलंकेत खेळल्या जाणाऱ्या तिरंगी एकदिवसीय मालिकेत इंडिया ए संघाने तुफानी कामगिरीच्या जोरावर फायनलमध्ये धडक मारली. मालिकेतील पाचव्या सामन्यात इंडिया–ए संघाने अफगाणिस्तान–एचा तब्बल १०१ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. दांबुला येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात भारतीय संघाने केवळ आपल्या मागील पराभवाचा बदलाच घेतला नाही, तर चार गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावत अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे.

या सामन्यात अफगाणिस्तानने टॉस जिंकून भारताला आधी फलंदाजीसाठी आमंत्रित केले. इंडिया–ए ची सुरुवात अत्यंत वादळी झाली. युवा सलामीवीर प्रियांश आर्यने ५८ धावा आणि वैभव सूर्यवंशीने ३८ धावा करत पहिल्या विकेटसाठी अवघ्या ८ षटकांत ७५ धावांची तुफानी भागीदारी केली. प्रियांशने आपल्या खेळीत ९ चौकार आणि १ षटकार ठोकला. सलामीवीर बाद झाल्यानंतर कर्णधार तिलक वर्मा आणि यष्टिरक्षक फलंदाज कुमार कुशाग्र यांनी डावाची सूत्रे हाती घेतली. तिलक वर्माने ५९ धावा तर कुमार कुशाग्रने ५८ धावांचे योगदान दिले. डावाच्या शेवटच्या षटकांमध्ये विपराज निगमने २० चेंडूंत ४ चौकारांच्या मदतीने वेगाने ३० धावा केल्या. यामुळे भारतीय संघाने निर्धारित ५० षटकांत ९ गडी गमावून ३१९ धावांचा विशाल डोंगर उभा केला. अफगाणिस्तान–एकडून फरीदून दाऊदजई, अब्दुल्ला अहमदजई आणि फरमानुल्लाह सफी यांनी प्रत्येकी २–२ बळी घेतले.

३२० धावांच्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना अफगाणिस्तान–ए ची सुरुवात खराब झाली. यश ठाकूरने तिसऱ्याच षटकात हसन ईसाखिलला (१४) बाद करत भारताला पहिले यश मिळवून दिले. यानंतर कर्णधार इम्रान मीर (३२) आणि खालिद तनीवाल (१३) हेदेखील स्वस्तात माघारी परतले. एकवेळ बहिर शाह (५७) आणि फैसल शिनोजादा (४६) यांनी चौथ्या विकेटसाठी ८७ धावांची भागीदारी केली.

# वैभव सूर्यवंशीशी पंगा पडला महागात; श्रीलंकेच्या खेळाडूवर मोठी कारवाई

**मुंबई : प्रतिनिधी**



भारत ‘अ’ आणि श्रीलंका ‘अ’ यांच्यातील सामन्यादरम्यान वैभव सूर्यवंशी आणि विशन हालंबागे यांच्यात जोरदार वाद आणि झटापट झाली. या प्रकरणाची गंभीर दखल घेत सामनाधिकारी प्रदीप जयप्रकाश यांनी श्रीलंकन खेळाडू विशन याला दंड ठोठावला आहे, मात्र भारतीय खेळाडू वैभव सूर्यवंशी याच्यावर कोणतीही कारवाई किंवा बंदी घालण्यात आली आहे की नाही याबाबतची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

श्रीलंकेचा अष्टपैलू खेळाडू विशेन हलांबागेला सामना पंचांनी दंड ठोठावला आहे. तिरंगी मालिकेतील सामन्यादरम्यान २१ वर्षीय हलांबागे आणि वैभव सूर्यवंशी यांच्यात वाद झाला. यावेळी त्यांच्यात धक्काबुक्कीही झाली. मिळालेल्या माहितीनुसार सामना सुरू होण्यापूर्वीच हलांबागे सूर्यवंशीवर टीका करत होता आणि त्याने या १५ वर्षीय खेळाडूवर वैयक्तिक स्वरूपाची टिप्पणीही केली होती. सामना संपल्यानंतरही त्याने सूर्यवंशीला काहीतरी म्हटल्यामुळे परिस्थिती अधिकच चिघळली. हा खेळाडू वैभव सूर्यवंशीच्या अगदी जवळ गेला आणि त्यानंतर सूर्यवंशीने त्याला धक्का दिला. या संपूर्ण घटनेत तो श्रीलंकन खेळाडू दोषी आढळला आहे.

भारत अ विरुद्ध खेळणाऱ्या श्रीलंकेचा अनुभवी यष्टिरक्षक निरोशन डिकवेला याच्यावरही सामना पंचांनी दंड ठोठावला आहे. डिकवेला एका वेगळ्या घटनेत दोषी आढळला. वैभव सूर्यवंशी याच्याशी झालेल्या वादासाठी त्याला जबाबदार धरण्यात आले नाही. विशेष म्हणजे विशन हलांबागे आणि वैभव सूर्यवंशी यांच्यातील तणाव निवळण्यासाठी डिकवेलानेच मध्यस्थी केली होती.

# प्रिन्स यादवला श्रेयस अय्यरने दिली डेब्यू कॅप

**लखनऊ : वृत्तसंस्था**



लखनऊच्या इकाना क्रिकेट स्टेडियमवरील अफगाणिस्तान विरुद्धच्या दुसऱ्या वनडे सामन्यात भारतीय संघाकडून आणखी एका खेळाडूला पदार्पणाची संधी मिळाली. आयपीएल स्पर्धेत गोलंदाजीची धार दाखवणाऱ्या प्रिन्स यादवला श्रेयस अय्यरने पदार्पणाची कॅप दिली. अफगाणिस्तान विरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील पदार्पणाची संधी मिळालेला तो तिसरा खेळाडू ठरला. धर्मशालाच्या मैदानात हर्ष दुबे व हरनूर सिंग ब्रार या दोघांनी टीम इंडियाकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या प्रवासाला सुरुवात केली होती. भारतीय संघ या सामन्यात पदार्पणाची संधी दिलेल्या प्रिन्स यादवसह आणखी तीन बदलांसह मैदानात उतरला आहे.

# रोहित शर्माचा विक्रम; लिस्ट ए क्रिकेटमध्ये १४००० धावा पूर्ण

**लखनऊ : वृत्तसंस्था**



अफगाणिस्तानचा संघ सध्या भारत दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या तीन वनडे सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना लखनऊच्या एकाना स्टेडियमवर सुरू आहे. या सामन्यात अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाकडून रोहित शर्माने मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. या डावात षटकार मारताच रोहितने लिस्ट ए क्रिकेटमध्ये १४००० धावा पूर्ण केल्या आहेत.

टी–२० आंतरराष्ट्रीय आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतर रोहित फक्त वनडे क्रिकेट खेळत आहे. पण त्याच्या फलंदाजीतील धार काही कमी झालेली नाही. मालिकेतील पहिल्या सामन्यात त्याला चांगली सुरुवात मिळाली होती, पण त्याला धावबाद होऊन माघारी परतावं लागलं होतं. या सामन्यातही त्याने दमदार सुरुवात केली. पण त्याला ४८ धावांवर माघारी परतावं लागलं आहे. राशिद खानने टाकलेल्या भन्नाट चेंडूवर रोहितची दांडी गुल झाली. त्यामुळे त्याचं अर्धशतक अवघ्या दोन धावांनी हुकलं. आधी चौकार आणि मग षटकार खेचून त्याने लिस्ट ए क्रिकेटमध्ये १४००० धावांचा पल्ला गाठला आहे. अशी कामिगिरी करणारा तो पाचवा भारतीय फलंदाज ठरला आहे. या यादीत सचिन तेंडुलकर, विराट कोहली आणि राहुल द्रविडसारख्या दिग्गज फलंदाजांचा समावेश आहे.

या यादीत अव्वल स्थानी असलेल्या सचिन तेंडुलकरच्या नावे लिस्ट ए क्रिकेटमध्ये २१,९९९ धावा करण्याची नोंद आहे, तर विराट कोहलीच्या नावे १६,४४७ धावा करण्याची नोंद आहे. या यादीत तिसऱ्या स्थानी असलेल्या सौरव गांगुलीने १५,६२२ धावा केल्या आहेत, तर राहुल द्रविड या यादीत चौथ्या स्थानी आहे. त्याने १५,२७१ धावा केल्या होत्या. आता या दिग्गजांच्या यादीत रोहित शर्माचेदेखील नाव जोडले गेले आहे. रोहितने १४००० धावा केल्या आहेत.

# बेल्जियमला मानावे लागले बरोबरीवर समाधान

## स्टार खेळाडूंची निराशाजनक कामगिरी



**सिएटल : वृत्तसंस्था**

केव्हिन डी ब्रूयने आणि रोमेलू लुकाकू या स्टार खेळाडूंनी गोलच्या संधी दवडल्याने बेल्जियमला विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील सामन्यात इजिप्तविरुद्ध १–१ अशा बरोबरीवर समाधान मानावे लागले. बेल्जियमच्या आघाडीचा खेळ अतिशय निराशाजनक ठरला. सिएटल येथे झालेल्या या सामन्यात इजिप्तचा कर्णधार मोहम्मद सलाह आणि बेल्जियमचे लुकाकू व डी ब्रूयने यांच्या कामगिरीकडे चाहत्यांचे विशेष लक्ष होते. सलाहच्या पासवर इमाम अशुरने गोल (२०व्या मिनिटाला) करत इजिप्तला आघाडी मिळवून दिली.

त्यानंतर दोन्ही संघांमधील चुरस अधिक वाढली. अनुभवी आघाडीपटू लुकाकू पायाच्या दुखापतीतून सावरत असल्याने प्रशिक्षकांनी त्याला आधी राखीव फळीत ठेवण्याचा निर्णय घेतला. त्याला उत्तरार्धात ६६व्या मिनिटाला मैदानावर उतरवण्यात आले आणि अवघ्या २४ सेकंदांत त्याने प्रभाव पाडला. त्याच्या समावेशानंतर बेल्जियमच्या आक्रमणाची गती वाढली. या दबावाखाली इजिप्तच्या मोहम्मद हानीकडून स्वयंगोल झाला आणि सामना १–१ असा बरोबरीत आला.

लुकाकू मैदानावर येण्यापूर्वी बेल्जियमचा संघ केवळ डी ब्रूयनेवर अवलंबून असल्याचे दिसले. त्याला सातव्या आणि ५४व्या मिनिटाला गोल करण्याची संधी होती, मात्र दोन्ही वेळा त्याला थोड्या अंतरावरून फटका मारता आला नाही. त्याचा फटका थोड्या बाजूने बाहेर गेला.

# लखनऊत रंगले राष्ट्रीय तायक्वांदो पंच सेमिनार

**लखनऊ : वृत्तसंस्था**



तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडिया व उत्तर प्रदेश तायक्वांदो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी क्रीडा संकुल, के. डी. सिंह बाबू स्टेडियम, लखनऊ येथे दि. १२ ते १४ जूनदरम्यान राष्ट्रीय पंच सेमिनार मोठ्या उत्साहात पार पडले. या सेमिनारसाठी आंतरराष्ट्रीय प्रथम श्रेणीचे रेफरी व ७वी डिग्री ब्लॅक बेल्ट सुभाष पाटील प्रमुख प्रशिक्षक म्हणून उपस्थित होते.

देशभरातील २०० हून अधिक तायक्वांदो खेळाडू व पंचांनी या सेमिनारमध्ये सहभाग नोंदवला. २०२६ साली वर्ल्ड तायक्वांदोने लागू केलेल्या नवीन नियमांचा अभ्यास सुभाष पाटील यांनी इस्वातिनी, दक्षिण आफ्रिका येथे जाऊन प्रत्यक्ष प्रशिक्षणाद्वारे केला आहे. भारतात त्या नियमांचा प्रसार करण्यासाठी ते सातत्याने कार्यरत असून नव्या नियमांवरील हे त्यांचे पाचवे राष्ट्रीय सेमिनार होते. तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडियामध्ये या नियमांचा सखोल अभ्यास करणारे ते एकमेव आंतरराष्ट्रीय पंच आहेत. सेमिनारमध्ये नवीन नियम, स्पर्धा संचालन, स्कोअरिंग सिस्टीम, शारीरिक पात्रता चाचणी तसेच लेखी परीक्षा घेण्यात आली.

उत्तर प्रदेश तायक्वांदो असोसिएशनचे महासचिव राजकुमार यांनी सांगितले की, सुभाष पाटील यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पंच म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. त्यांनी विविध देशांमध्ये जाऊन तायक्वांदो विषयक सेमिनार घेतले असून ते प्रथम श्रेणीचे आंतरराष्ट्रीय पंच आहेत. राजकुमार पुढे म्हणाले की, सुभाष पाटील तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडियामध्ये अतिशय प्रभावीपणे कार्य करत आहेत. स्वतः सातत्याने उपस्थित राहून ते भारतीय खेळाडू व पंचांना नवीन नियमांची माहिती देतात.

त्यामुळे देशातील तायक्वांदो क्षेत्राला मोठा लाभ होत आहे. त्यांनी उत्तर प्रदेशातील पंचांना उत्कृष्ट प्रशिक्षण देत विविध देशांतील अनुभवही सांगितले. या उल्लेखनीय योगदानाबद्दल उत्तर प्रदेश तायक्वांदो असोसिएशनतर्फे सुभाष पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांना अयोध्या धाम येथील भगवान रामलल्ला यांची पवित्र मूर्ती भेट देऊन गौरविण्यात आले.

# रोहित शर्माचा ‘चिकनी चमेली’वर भन्नाट डान्स

## व्हिडीओ व्हायरल



**लखनऊ : वृत्तसंस्था**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील दुसरा वनडे सामना लखनऊच्या एकाना स्टेडियमवर सुरू असताना मैदानाबाहेरून एक वेगळाच व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. भारतीय कर्णधार रोहित शर्माचा ‘चिकनी चमेली’ या गाण्यावर केलेला भन्नाट डान्स सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. सामन्यादरम्यान ड्रिंक्स ब्रेकमध्ये डगआऊटमध्ये बसलेल्या रोहित शर्माचा एक व्हिडीओ समोर आला आहे. मैदानावर डीजे वाजत असताना ‘चिकनी चमेली’ हे गाणे लागले आणि रोहितने जागेवर बसल्याबसल्या हातवारे करत डान्सला सुरुवात केली.

त्याचे हे मजेशीर एक्सप्रेशन आणि स्टेप्स पाहून डगआऊटमधील इतर खेळाडूही हसू लागले. रोहितच्या या अंदाजाचे व्हिडीओ आता सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले असून चाहत्यांनी त्यावर लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. दरम्यान, या सामन्यात रोहित शर्माने फलंदाजीतही कमाल केली. त्याने लिस्ट ‘अ’ क्रिकेटमध्ये १० हजार धावांचा टप्पा पूर्ण करत आणखी एक विक्रम आपल्या नावावर केला. टी–२० आणि कसोटीतून निवृत्ती घेतल्यानंतर रोहित वनडेवर लक्ष केंद्रित करत आहे आणि मैदानावर तसेच मैदानाबाहेरही तो चाहत्यांचे मनोरंजन करताना दिसत आहे.

## राज्यस्तरीय रग्बी स्पर्धा

# आकांक्षा फाउंडेशनची दुहेरी कांस्यझेप

**नवी मुंबई : बातमीदार**



१३व्या महाराष्ट्र राज्य रग्बी अजिंक्यपद स्पर्धेत नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ९३ (सीबीएसई) व आकांक्षा फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करत मुलांच्या आणि मुलींच्या गटात कांस्यपदक पटकावून दुहेरी यश संपादन केले. महाराष्ट्रातील ३२ जिल्ह्यांमधून एकूण ३८४ खेळाडूंनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत आकांक्षाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाच्या जोरावर विशेष छाप पाडली.

या यशस्वी संघामध्ये डी. एन. नगर मुंबई पब्लिक स्कूल, सीताराम मिल कंपाऊंड मुंबई पब्लिक स्कूल, वाडीबंदर मुंबई पब्लिक स्कूल, नटवर नगर मुंबई पब्लिक स्कूल तसेच नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक ९३ येथील विद्यार्थ्यांचा समावेश होता. खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक समन्वय, जिद्द आणि कौशल्याचे प्रदर्शन करत राज्यस्तरीय स्पर्धेत तिसरे स्थान पटकावले. कठोर सराव, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि उत्कृष्ट सांघिक खेळाच्या बळावर मिळविलेल्या या यशामुळे शाळांचा, आकांक्षा फाऊंडेशनचा आणि मुंबईचा गौरव वाढला आहे. खेळाडू, प्रशिक्षक आणि पालकांवर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दरम्यान, आकांक्षा मुंबई पब्लिक स्कूलच्या क्रीडा विकास उपक्रमांना मिळालेले यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असेच आहे. या यशामागे मुख्याध्यापिका डायना इसाबेल व उपमुख्याध्यापक निलेश वाधवा यांचे प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com